■ लातूर, (नांदेड, बीड, हिंगोली, उस्मानाबाद, परभणी) जिल्ह्यात जाणारे दैनिक ■ सोमवार,दि.२२ एप्रिल २०१९ ■ वर्ष ११ ■ अंक १६१ ■स्वागत मुल्य :४ रु. ■ पाने ६

# मराठवाडा नेता

संस्थापक संपादक : प्रा.रामेश्वर बद्दर रेणापूरकर   मुख्य संपादक : अरविंद जोशी   कार्यकारी संपादक : सत्यजीत रामेश्वर बद्दर ९८९०२७१७१०


अप्पाबाबा महाराज रुईकर


ह.भ.प.गहिनीनाथ महाराज

# साखळी बॉम्बस्फोटांनी श्रीलंका हादरले

## २०७ जणांचा मृत्यू तर ४५० जखमी; सात संशयितांना अटक

कोलंबो : वृत्तसंस्था

श्रीलंकेच्या कोलंबोमध्ये तब्बल आठ ठिकाणी रविवारी (२१ एप्रिल) साखळी बॉम्बस्फोट झाल्याची घटना समोर आली आहे. यातील तीन बॉम्बस्फोट हे चर्चमध्ये तर ३ बॉम्बस्फोट हे हॉटेलमध्ये झाल्याची माहिती मिळाली होती. मात्र त्यानंतर आता आणखी दोन बॉम्बस्फोट करण्यात आले आहेत. सातव्या बॉम्बस्फोटात दोन जणांचा मृत्यू झाला आहे तर आठव्या बॉम्बस्फोटात तीन जणांचा मृत्यू झाला ईस्टर संडेला झालेल्या या बॉम्बस्फोटात आतापर्यंत २०७ जणांचा मृत्यू झाला असून ४५० हून अधिक जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी सात जणांना अटक केल्याची माहिती मिळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जगभरात ईस्टर संडे साजरा होत असताना श्रीलंकेतील कोलंबो साखळी बॉम्बस्फोटांनी हादरले आहे. कोलंबोमधील शँग्रिला आणि सिंनामोन ग्रँड हॉटेलमध्ये तसेच कोलंबो बंदराजवळील सेंट अँथनी चर्च, कोच्चिकेडे चर्च, उत्तलम जवळील सॅबेस्टिअन चर्च या तीन चर्चमध्ये स्फोट झाल्याची माहिती मिळत आहे. रविवारी (२१ एप्रिल) स्थानिक वेळेनुसार सकाळी ८.४५ वाजण्याचा सुमारास हा स्फोट झाल्याची माहिती काही नागरिकांनी दिली आहे. या साखळी बॉम्बस्फोटात शेकडो लोक मृत्युमुखी, तर अनेक जण जखमी झाले आहेत. या स्फोटांमध्ये किती नुकसान झाले याबाबत माहिती गोळा करण्याचे काम सुरू असल्याचे स्थानिक प्रशासनाचे म्हणणे आहे.

ईस्टर संडे असल्याने चर्चमध्ये मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या बॉम्बस्फोटात आतापर्यंत २०७ जणांचा मृत्यू झाला ४५० हून अधिक जण जखमी झाले आहेत. जखमींवर उपचार सुरू असून अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जखमी आणि मृतांमध्ये विदेशी पर्यटकांचाही समावेश अधिक असून ३५ जणांचा मृत्यू झाला आहे. बॉम्बस्फोटाची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. या स्फोटाची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने स्वीकारलेली नाही.

भारताच्या परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी कोलंबोतील बॉम्बस्फोटांच्या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. 'कोलंबो येथील भारतीय उच्चायुक्तांच्या संपर्कात आहोत. तेथील परिस्थितीचा आढावा घेतला जात आहे' असं ट्वीट सुषमा स्वराज यांनी केलं आहे. तसेच कोलंबोतील साखळी बॉम्बस्फोटाच्या घटनेनंतर श्रीलंकेतील भारतीय दूतावासाकडून हेल्पलाईन नंबर जारी करण्यात आला आहे.

कोलंबोतील परिस्थितीवर आम्ही नजर ठेवून असल्याची माहिती देणारे ट्वीट भारतीय दूतावासाने देखील केले आहे. या ट्वीटमध्ये भारतीय नागरिकांसाठी हेल्पलाइन क्रमांक देण्यात आला आहे. कोलंबो आणि बट्टीकालोआमध्ये स्फोट झाल्याची माहिती आम्हाला मिळाली असून आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे ट्वीटमध्ये म्हटले आहे. मदत किंवा इतर माहितीसाठी भारतीय नागरिकांना संपर्क करता यावा साठी क्रमांकही देण्यात आले आहेत. +९४७७७ ९०३०८२,+९४११२४२२७८८,+९४११२ ४२२७८९, +९४११२४२२७८९ हे संपर्क क्रमांक देण्यात आले आहेत तर श्रीलंकेतील संपर्क क्रमांकाव्यतिरिक्त+९४७७७९०२०८२ +९४७७२२३४१७६ या क्रमांकावरही भारतीय संपर्क करू शकतात.





### श्रीलंकेत सोशल मीडियावर बंदी

श्रीलंकेची राजधानी कोलंबोत स्थानिक वेळेनुसार सकाळी ८.४५ वाजता सहा साखळी बॉम्बस्फोट घडले. दुपारनंतर आणखी दोन स्फोटांनी कोलंबो हादरले. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून आज सायंकाळी ६ वाजेनंतर संपूर्ण श्रीलंकेत संचारबंदी लागू करण्यात येणार आहे. तसेच संबंधीत घटनेबाबत अफवा पसरू नये यासाठी सरकारने देशातील सोशल मीडियावर बंदी आणली आहे.

### दुपारनंतर आणखी दोन स्फोट

रविवारी सकाळी झालेल्या सहा साखळी बॉम्बस्फोटानंतर दुपारी कोलंबोत आणखी दोन स्फोट झाले. सायंकाळी ६ वाजेनंतर कोलंबोत संचारबंदी लागू करण्याची श्रीलंकेच्या संरक्षण मंत्री रूवान विजेवर्धने यांनी घोषणा केली.



### ३५ परदेशी नागरिकांचा समावेश

या साखळी बॉम्बस्फोटात १८५ पेक्षा अधिक नागरिक मृत्युमुखी पडले असून त्यात ३५ परदेशी नागरिकांचा समावेश आहे. ईस्टर संडे निमित्त ते येथील चर्चमध्ये आले होते. परदेशी नागरिकांना निशाण्यावर ठेवून हा स्फोट घडविण्यात आल्याचे प्रसारमाध्यमांकडून समजते आहे.

### भारतातही हायअलर्ट

आम्ही कोलंबोतील भारतीय उच्च-आयुक्तांच्या संपर्कात असून भारत श्रीलंकेतील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवत असल्याचे परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी सांगितले. श्रीलंकेत झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर भारतातही हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. या हल्ल्यात सर्व श्रीलंकेतील भारतीय नागरिक सुखरूप आहेत.





**उस्मानाबाद: आज उमरगा येथे साई मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे शुभारंभ सद्गुरू श्री गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले, त्यावेळी लातुरचे पालकमंत्री श्री संभाजी पाटील निलंगेकर, उस्मानाबादचे खासदार श्री रविंद्र गायकवाड, औसाचे आमदार श्री बसवराजजी पाटील,शिक्षणमहर्षी श्री अनिरुद्ध जाधव, उमरगाचे आमदार श्री ज्ञानराज चौगुले,प्लास्टिक सर्जन डॉ विठ्ठल लहाने,श्री श्रीरंग महाराज औसेकर, उमरगाचे नगराध्यक्षा सौ प्रेमलताबाई टोपगे, हॉस्पिटलचे संचालक- डॉ अनंत मुगळे, डॉ अजित शिंदे, डॉ सचिन तावशीकर, डॉ सिद्राम ख्याडे, डॉ संजय येळापुरे व ईतर मान्यवर उपस्थित होते.**

### पांडुरंग गुडगिल्ला यांचे निधन;दोन दिवस बैठक

लातूर, दि. २१ :....

येथील व्यापारी पांडुरंग भगिरथ गुडगिल्ला यांचे नुकतेच निधन झाले. उठावणा रविवार दि. २१ एप्रिल रोजी झाला असून बैठकीचे आयोजन मंगळवार दि. २३ आणि बुधवार दि. २४ एप्रिल रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत निजी निवास, चैनसुख रोड, लातूर येथे करण्यात आले आहे.



पांडुरंग गुडगिल्ला यांचे दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वा. हृदयविकाराच्य तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. स्व. पांडुरंगजी यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, चार मुली, दोन भगिनी असा परिवार आहे. दि. २३ व २४ एप्रिल रोजी निजी निवास येथे शोक बैठक होणार आहे. गुडगिल्ला परिवारावर कोसळलेल्या दुःखात दै. मराठवाडा नेता परिवार व बद्दर परिवार सहभागी आहे.

### पाकसाठी ती 'काळरात्र' ठरली असती: मोदी

पाटन : वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातमधील पाटन जिल्ह्यात रविवारी झालेल्या सभेत काँग्रेससह विरोधी पक्षांवर टीकास्त्र सोडलं. या सभेत त्यांनी सर्जिकल स्ट्राइक आणि एअर स्ट्राइकचा उल्लेख केला. पाकिस्ताननं हवाई दलाचे पायलट अभिनंदन वर्तमान यांना भारताकडे सोपवलं नसतं तर, त्यांच्यासाठी ती 'कत्ल की रात' ठरली असती असा इशारा मी दिला होता, असं मोदी म्हणाले.

मोदींनी पाटनमधील सभेत सरकारनं केलेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. तसंच काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांवर हल्ला चढवला. 'भूमिपुत्राची काळजी घेणं हे माझ्या राज्यातील लोकांचं कर्तव्य आहे. गुजरातमधील सर्व २६ जागा जिंकून द्या. माझं सरकार सत्तेत येईल, पण माझ्या राज्यातील २६ जागांवर विजय मिळाला नाही, तर असं का झालं? यावर २३ मे रोजी वृत्तवाहिन्यांवर चर्चा होईल,' असं ते म्हणाले. पंतप्रधानपदावर असो किंवा नसो, पण एक तर मी जिवंत राहील किंवा दहशतवादी



जिवंत राहतील, असा निर्धार करत मोदींनी मतदारांना भावनिक आवाहन केलं.

या सभेत मोदींनी राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. मोदी काय करतील हे मला ठाऊक नाही असे शरद पवार सांगतात. मी उद्या काय करणार आहे ते पवारांना माहीत नाही, तर इम्रान खानला कसं माहीत होणार? असा सवालही त्यांनी केला. दरम्यान या सभेत नरेंद्र मोदी यांनी विरोधकांच्या आरोपांना सडेतोड उत्तर देत देशाच्या प्रगतीसाठी भाजपाला साथ देण्याचे आवाहन मतदारांना केले.

### राहुल गांधींनी परवानगी दिली तर वाराणासीतून लढायला आवडेल: प्रियांका

नवी दिल्ली: वृत्तसंस्था

काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी परवानगी दिली तर मला वाराणासीतून लढायला आवडेल, अशा शब्दांत प्रियांका गांधी यांनी पुन्हा एकदा मनातील इच्छा बोलून दाखवली आहे. त्यामुळे प्रियांका गांधी या पंतप्रधान नरेंद्र मोदींविरोधात वाराणासीतून लढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



प्रियांका गांधी यांनी यापूर्वीही वाराणासीतून लढण्याचे संकेत दिले होते. त्यावर भाजप अध्यक्ष अमित शहा यांनी प्रियांका यांना वाराणासीतून लढण्याचं आव्हान दिलं होतं. प्रियांका यांनी वाराणासीतून लढण्याची हूल देऊ नये. त्यांनी खरोखरच वाराणासीतून लढावं, असं आव्हान अमित शहा यांनी दिलं होतं. त्यावर प्रियांका यांना प्रसारमाध्यमांनी तुम्ही वाराणासीतून लढणार का? असा सवाल केला असता काँग्रेस अध्यक्षांनी परवानगी दिल्यास वाराणासीतून लढायला मला आनंदच वाटेल, असं त्या म्हणाल्या. दरम्यान, प्रियांका यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार हल्ला चढवला. मोदी हे देशातील सर्वात कमकुवत पंतप्रधान आहेत, अशी टीका त्यांनी केली. ज्यांकडे राजकीय इच्छाशक्ती असते, ते लोक जनतेला घाबरत नाहीत. ते कमकुवत पंतप्रधान आहेत. त्यांच्याकडे आत्मशक्ती नाही. कमकुवत आणि कमजोर असल्यामुळेच ते ५६ इंचाची छाती असल्याच्या बाता मारतात, असा घणाघातही त्यांनी केला.

## तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या

नवी दिल्ली: वृत्तसंस्था

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या तोफा आज थंडावल्या. तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रासह देशभरातील १६ राज्यातील ११८ लोकसभा मतदारसंघात येत्या २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्यात महाराष्ट्रातील १४ जागांचा समावेश असून अनेक मतदारसंघात चुरशीची लढत होणार असल्याने त्याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागलं आहे.

तिसऱ्या टप्प्यातील निवडणूक प्रचारासाठी सर्वच राजकीय पक्षांनी जोर लावला होता. काँग्रेस, राष्ट्रवादी, बसपा, सपा, भाजप, शिवसेना, माकप आणि वंचित बहुजन आघाडीसह विविध पक्षांच्या उमेदवारांनी बाईक रॅलीसह भेटीगाठी आणि सभांवर जोर दिला होता. आज रविवारचा



दिवस असल्याने सर्वच उमेदवारांनी रोड शोवर भर देऊन प्रचाराचा धुरळा उडवून दिला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी, काँग्रेस महासचिव प्रियांका गांधी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा, तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर, एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवैसी, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आदी नेत्यांनी त्यांच्या भाषणातून एकमेकांवर टीका करत मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला होता. तिसऱ्या टप्प्यातील प्रचाराच्या शेवटच्या दिवशी मोदींनी तीन सभा घेतल्या, अमित शहा यांनी एक रोड शो केला. तर काँग्रेसनेही तीन सभा घेतल्या.

दुसऱ्या टप्प्यात निवडणूक आयोगाने तामिळनाडूतील वेल्लोर आणि त्रिपूरा पश्चिम लोकसभा मतदारसंघातील निवडणूक रद्द केली होती. त्या ठिकाणीही तिसऱ्या टप्प्यात मतदान होणार असल्याने १६ राज्यांतील ११८ लोकसभा मतदारसंघात २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्याचबरोबर गुजरातमधील सर्वच्या सर्व २६ लोकसभा मतदारसंघातही मतदान होणार आहे.

**'यांचे' भवितव्य मतपेटीत बंद होणार**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा, काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी, भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे, राष्ट्रवादीच्या सुप्रिया सुळे, राष्ट्रवादीचे उदयनराजे भोसले, स्वाभिमानीचे राजू शेट्टी, समाजवादी पार्टीचे नेते मुलायमसिंह यादव, भाजपचे वरुण गांधी, भाजप नेत्या जयाप्रदा आदींचे भवितव्य २३ एप्रिल रोजी मतपेटीत बंद होणार आहे.

**तिसऱ्या टप्प्यात 'या' ठिकाणी मतदान होणार**

महाराष्ट्र (१४ मतदारसंघ) : जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, रायगड, पुणे, बारामती, अहमदनगर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले

# नांदेडकरांनो सावधान...

## विष्णुपूरी जलाशयात महिनाभर पुरेल एवढा पाणीसाठा

नांदेड/प्रतिनिधी -

शहराच्या दक्षिण भागाला पाणी पुरवठा करणाऱ्या विष्णुपूरी येथील शंकरसागर जलाशयात २० मे पर्यंत पुरेल एवढाच पाणीसाठा शिल्लक असल्याने नांदेड करांनी पाणी जपून वापरावे असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे.

शहरातील लोकसंख्येच्या प्रमाणात पाण्याचे स्त्रोत उपलब्ध नाहीत. नांदेड शहराच्या दक्षिण भागाला विष्णुपुरी येथील शंकरसागर जलाशयातून पाणी पुरवठा केला जातो तर उत्तर भागाला इसापुर धरणाचे पाणी मिळते. यावर्षीच्या कमी पर्जन्य मानामुळे गत दोन महिन्यापासून नांदेडकरांना पाण्याची चनचन भासत आहे. तसेच मनपा प्रशासनाने दोन दिवसाआड शहराला पाणी पुरवठा केला आहे.

पाण्याचे दुर्भीक्ष पाहून मनपा प्रशासन तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येत असून नांदेड उत्तर भागासाठी ईसापुर धरणातून प्रशासाने यापुर्वी तीन पाण्याच्या पाळया मागवल्या आहेत तर चौथ्या पाळीचे असलेले एक दलघमी पाणी मागवले असल्याचे सांगण्यात आले. सद्या स्थितीला विष्णुपुरी येथील शंकरसागर जलाशयात दहा दलघमी एवढा पाणीसाठा असून त्यातील २.७५ मृतसाठा आहे. नांदेड शहरासाठी दररोज ९० मिलीमीटर एवढा पाणीसाठा लागतो परंतु विष्णूपुरी जलाशयात असलेला पाणीसाठा येत्या २० मे पर्यंत पुरेल एवढा असल्याने नांदेड करांची चिंता वाढली आहे. शंकरसागर जलाशयातील पाणीसाठा महापालिका प्रशासनाने नांदेड दक्षिण व उत्तर या भागासाठी वापरल्याने जलाशयातील पाणी कमी झाले आहे. त्यातच उन्हामुळे होणारे पाण्याचे बाष्पीभवन यामुळे पाणीसाठ्यात मोठी घट निर्माण होत आहे. यासाठी नांदेडकरांनी येणाऱ्या काळात पाणी जपून वापरावे असा संदेश प्रशासनाच्या वतीने देण्यात येत आहे.

नांदेड महापालिकेचे आयुक्त लहुराज माळी हे मध्य प्रदेशात निवडणूक निरीक्षक म्हणून विदिशा लोकसभा मतदारसंघात जात आहेत. त्यांचा अतिरिक्त पद्भार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक काकडे यांच्याकडे देण्यात आला आहे. ऐन पाणी टंचाईच्या काळात काकडे यांच्याकडे अतिरिक्त पद्भार आल्याने त्यांच्यावर जिल्ह्यासह शहराच्या पाणी व्यवस्थापनाची जबाबदारी आली असून येणाऱ्या काळात ते कसे नियोजन करणार याकडे नांदेड शहरासह जिल्हयातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.



**याबाबत मनपाचे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुग्रिव अंधारे यांच्याशी विचारणा केली असता शंकरसागर जलाशायात १० दलघमी म्हणजेच महिनाभर पुरेल एवढा पाणीसाठा उपलब्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच नांदेड उत्तर भागाला ईसापुर धरणातून येत्या दोन दिवसात एक दलघमी पाणी मिळण्याचे नियोजन केले असल्याचे सांगत. शहराला तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवल्या असल्याचे त्यांनी मराठवाडा नेतांशी बोलतांना सांगितले.**

# भाजीपाल्याचे भाव गगणाला

नांदेड/प्रतिनिधी - जलस्त्रोत आटल्याने बहुतांश भाजांची आवक घटली असून कांदा वगळता सर्वच भाज्यांचे भाव गगणाला भिडले आहेत. फोडणीला चव देणाऱ्या कोथींबीरने शतक गाठले आहे.

नांदेड जिल्हा शहर व परिसरात गेल्या काही दिवसापासून उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली आहे. एकीकडे तापमानात वाढ झाली असून दुसरीकडे जलस्त्रोत आटले आहेत. गेल्या आठवडयात नांदेडचे तापमान ४३ अंश सेल्सिसीयस इतके झाले होते. वाढत्या तापमानामुळे जनजिवन विस्कळी झाले आहे. पुर्वीच्या तुलनेत भाजीपाल्यांची आवक कमी झाल्याने दर वधारले आहेत. नांदेड शहरात लगतच्या ग्रमिण भागातील तसेच तेलंगणा, जळगांव, भुसावळ आदि भागातून वेगवेगळा भाजीपाला येतो. आजमितीस कांदा वगळता सर्वच भाज्यांची दर वाढले आहेत.

एरव्ही ३० ते ४० किलो मिळणार मिरची शंभर रूपये किलो दराने विक्री होत आहे. वांगे, शिमला मिरची, भिंडी, गवार शेंग, टमाटे, कारले आदी भाज्यांच्या दरात दुप्पटीने वाढ झाली आहे. फोडणीत चव आणणाऱ्या कोंथीबीरचा दर शंभर रूपये किलो झाला आहे. भाज्यांची आवक कमी झाल्याने हे दर वाढल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. एकिकडे भाज्यांचे दरवाढ होत असतांना दुसरीकडे कांद्याचे दर मात्र गडगडले आहेत. नांदेडच्या बाजारात कांदा ८ ते १० रूपये दराने विक्री होत आहे. विक्रीसाठी आलेल्या भाज्या ताज्या ठेवतांना व्यापाऱ्यांची चांगलीच कसरत होत आहे. उन्हाची तिव्रता वाढल्याने वारंवार पाणी मारून भाजी ताजी ठेवतांना छोटया विक्रेत्यांची दमछाक होत आहे.

नांदेड जिल्हया लगतच्या तेलंगणा राज्यात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. तेलंगणातून नांदेड मध्ये मोठया प्रमाणावर भाजीपाला येतो. गोबी,टोमॅटो, आलू तसेच आद्रक-लसन तेलंगणातून येते. शिवाय नांदेडची कोथींबीर विदर्भ तसेच अन्य भागात निर्यात केली जाते. तेलंगणातून येणाऱ्या भाजीपाल्यामध्ये घट झाल्याने आगामी काळात हे दर आणखीन वाढतील असे मानले जाते. शहरात इतवारा तसेच तरोडा नाका परिसरात दररोज सकाळी शेतकरी भाजीपाला विक्रीसाठी आणतात. पाणी कमी झाल्यामुळे शहरालगतच्या शेतकऱ्यांनी भाजीपाल्याचे उत्पादन थांबवले आहे.

गेल्या दोन आठवडयापासून भाजीपाल्याच्या दरात वाढ झाली आहे. कोथीबीर, मिरची, वांगे यासह काही भाजीपाल्याची आवक घटली आहे. त्यामुळे दरवाढ अपरिहार्य झाली आहे. पाण्याच्या टंचाईमुळे आगामी काळातही भाजीपाल्यांचेही दर वाढतील. अन्य जिल्हयातून वेगवेगळया भाज्या येण्याचे प्रमाण कमी झाले आहे. त्याचा फटका आमच्यासह सामान्य नागरिकांनाही बसू शकतो.

## टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धेत १५ जिल्ह्यांचे संघ सहभागी

नांदेड दि.

नांदेड जिल्हा टेनिस व्हॉलीबॉल असोसिएशन व टेनिस व्हॉलीबॉल महाराष्ट्र संघटना यांच्या वतीने दि. २० एप्रिल रोजी पासून जिजाऊ सृष्टी मैदान, सिडको येथे सुरुवात झाली. राज्यभरातील एकुण १४ जिल्ह्यातील संघ सहभागी झाले आहेत.

स्पर्धेचे उद्घाटनप्रसंगी क्रीडा संचालक डॉ. विठ्ठल सिंह परीहार, टेनिस व्हॉलीबॉलखेळाचे जनक डॉ. व्यंकटेश वांगवाड, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त जनार्दन गुपीले, गणेश माळवे, किशोर चौधरी, सोपान पांडे, संकेत पाटील, प्रा. मधुकर गायकवाड, प्रा. रमेश नांदेडकर , संजय मोरे, सतीश मोरे, डॉ. राहुल वाघमारे, काशीम खान, राम पवार, राष्ट्रीय खेळाडू मीराताई मोरे, सुनील दोसलवार यांची प्रमुख उपस्थिति होती. मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. परीहार यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा विषयांवर मार्गदर्शन केले. क्रीडा स्पर्धा यशस्वी होण्यासाठी संदीप कदम, राहुल ढगे, आजिंक्य पवार, आशिष पवार, शुभम कदम, सचीन वाघमारे यांनी परीश्रम घेतले. दोन दिवस मोठा उत्साह पाहायला मिळाला.

# अंधश्रध्दा निर्मूलनासाठी व्यापक प्रबोधनाची गरज-कमलाकर जमदाडे

बिलोली/वार्ताहर-

अंधश्रध्दा ही समाज विकासातील मोठी अडचण असून समाजातील मोठा वर्ग या समस्थेचा बळी ठरला आहे.त्याला त्यातून बाहेर काढण्यासाठी व्यापक प्रबोधनाची गरज असल्याचे प्रतीपादन अंधश्रध्दा निर्मूलन समीतीचे कार्यकर्त कमलाकर जमदडे यांनी सगरोळी येथे केले.संस्कृती संवर्धन मंडळाच्या वतीने शारदानगर येथे आयोजित करण्यात आलेल्या वासंतीक उन्हाळी शिबीरात केले. उन्हाळ्याच्या सुट्यात विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच सृजनशीलता वाढावी यासाठी सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यात १५ते ३५ वयोगटातील मुला मुलींना सहभागी करुन घेण्यात आले आहे.

सदरील शिबीरात अंधश्रध्दा विषयी विद्यार्थ्यांमध्ये असलेले गैरसमज दूर व्हावेत. त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा यासाठी वेगवेगळ्या प्रयोगांचे सादरीकरण करुन त्यामागी असलेले विज्ञान विषद केले.अनेकदा वैज्ञानिक गोष्टीचा आधार घेऊन समाजातील संधीसाधू त्याला भूतबाधेची उपमा देऊन चमत्कारिक पध्दतीने लोकांची फसवणूक करतात.त्यामुळे आपण चिकित्सक व डोळस होऊन असे प्रकार वेळीच रोखले पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी विद्यार्थासमोर बोलताना व्यक्त केली.

सदरील शिबीर हे पूर्णवेळ निवासी असून त्यात व्यक्तीमत्व विकासासाठीचे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात.सदरील शिबीर हे १५एप्रील ते २४ एप्रील दरम्यान आयोजीत केले आहे.या शिबीरामध्ये प्रेरणादायी व्याख्यान,चित्रकला,रांगोळी ,कथाकथन,साहसी मैदानी खेळ,संस्कारक्षम चित्रपटइत्यादी उपक्रमांचा समावेश आहे.या शिबीराला प्रमुख मार्गदर्शन म्हणून संबोधीत करताना जमदडे पुढे म्हणाले.अंधश्रध्दा निर्मूलानासाठी नरेंन्द्र दाभोळकर यांनी अनेक खस्ता खाल्या प्रसंगी त्यामुळेच त्यांना आपले,प्राण गमवावे लागले. त्यांच्यापश्चात अंधश्रध्दा निर्मूलन समीती हे काम नेटाने पुढे नेत आहे.तुम्हीही पुढे जाऊन या विषयी समाजात जाणीवजागृती करावी अशी भावना व्यक्त केली.शिबीराच्या अध्यक्षस्थानी राजेश नरवाडे तर प्रमुख उपस्थिती प्राचार्य व्यंकटराव कुलकर्णी ,प्रदीप भुसावळे ,शाहूराज काळम,निरंजन महेशकर ,होनराव सुर्यकांत कवडे मंडम यांच्यासह मोठ्या प्रमाणात शिबीरार्थींची उपस्थिती होती.



## हजरत सय्यद ऐनुल्ला शाह यांच्या उर्स निमित्त कार्यक्रम

मुक्रमाबाद/वार्ताहर -

मुक्रमाबाद येथील हजरत सय्यद ऐनुल्ला शाह (रहे)यांच्या ४० वा उर्स २६ एप्रिल पासुन प्रारंभ होणार असुन या उर्स निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उर्स साठी महाराष्ट्र,तेलंगणा,आंध्र राज्यातील भावीक भक्त आपली नवस (मन्नत)फेडण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत असतात भावीकानी मागलेली नवस (मन्नत)येथे पुर्ण होते अशी या शाह बाबा दर्गाची अख्यायीका असुन हिंदू व मुस्लीम या दोन्ही धर्मातील लोकांची मनोभावे श्रद्धा आहे.

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील हिंदू मुस्लीम एकतेचे प्रतिक मानल्या जाणाऱ्या सुप्रसिद्ध सुफी संत हजरत सय्यद ऐनुल्ला शाह (रहे) यांच्या उर्स निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन या कार्यक्रमात दि.२६ एप्रिल रोजी दु.दोन वाजता संदल मिरवणूक आसताना गल्ली येथुन निघुण जुन्या बाजारपेठेतुन फिरत नवीन बाजारपेठेतील मुख्य चौकातील हजरत खाव्जा बंदा नवाज यांच्या दर्गा जवळ येवून तेथुन बाजारपेठेतुन व बसस्थानकावरील मुख्य चौकातुन मार्गस्थ होवुन हजरत सय्यद ऐनुल्ला शाह यांच्या दर्गावर संदल पोहचेल संदल पोहचताच उर्स कमेटी च्या वतीने दर्गावर संदल चढवण्यात येईल.त्यानंतर ठिक रात्री ८- वाजता भोपाळ (मध्यप्रदेश ) येथील कव्वाला इंतजार चिश्ती व मुंबई येथील सुफी सिंगर असलम हुसैनी यांचा कव्वालीचा जंगी मुकाबला होणार असुन दुसऱ्या दिवशी २७ एप्रिल ला ही पुन्हा या दोघात कव्वाली मुकाबला होणार आहे.व २८ एप्रिल रवीवार रोजी सकाळी ६ वाजता तबरुक (महाप्रसाद) वाटप करुन कार्यक्रमाची सांगता होणार आहे.या उर्स निमित्त होणाऱ्या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त भावीक भक्तांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावे असे आव्हान उर्स कमेटी चे अध्यक्ष पत्रकार रज्जाक कुरेशी, व सचिव रफी सय्यद, शादुल तांबोळी,बबरु तांबोळी,जैनु हिंगजीरे, सद्दाम कुरेशी, रमाअप्पा बोधने,मस्तान शेख, खलील पटेल,हमीद कुरेशी, शफी कुरेशी आदिने केले आहे.

## दुचाकीवरून लिफ्ट द्यायला गेला कायद्याच्या कचाट्यात अडकला

नांदेड/प्रतिनिधी - दुचाकीवरून बाहेरगावी निघालेल्या तरूणास हात दाखवल्याने पाठीमागे बसलेल्या तरूणाचा ब्रेक मारताच पडून मृत्यू झाल्याची घटना हदगांव तालुक्यात शनिवारी घडल्याने, एका तरूणाचा दुचाकीवरून लिफ्ट देणे चांगलेच महागात पडले. या प्रकरणी हदगांव पोलिसांनी गुन्हा दाखल केला असुन लिफ्ट द्यायला गेला व कायद्याच्या कचाट्यात अडकला अशी अवस्था एका तरूणाची झाली आहे.

हदगांव तालुक्यातील शिरढ येथील अविनाश जगदिश काकडे हे आपल्या दुचाकी क्र. एम.एच. २६ बी.एन. ३७०४ या दुचाकीवरून बाहेरगांवी निघाले असता त्यांना गावातील ज्ञानेश्वर शामराव काकडे वय २० वर्ष या मजूराने हात दाखवला व मला दुचाकीवर येऊ द्या अशी विनंती केली. अविनाश काकडे व ज्ञानेश्वर काकडे हे दोघेजन दुचाकीवरून भरधाव वेगात निघाले. शिरड येथीलच नरेश रामराव शिरडकर यांच्या शेताजवळील एका वळणावर अविनाश काकडे यास दुचाकीचा वेग नियंत्रणात ठेवता न आल्यामुळे अचानक ब्रेक लावले. या दरम्यान पाठीमाग बसलेला तरूण ज्ञानेश्वर काकडे हा दुचाकीवरून पडून गंभीर जखमी झाला व त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने जागीच मृत्यू झाला. ज्ञानेश्वर काकडे याच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याची तक्रारी शंकरराव काकडे यांनी दिल्यावरून हदगांव पोलिसांनी अविनाश काकडे याच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास अधिक तपास पोलीस निरीक्षक गणेश गायके हे करित आहेत. या घटनेने दुचाकीवरून लिफ्ट देणे तरूणास चांगलेच महागात पडले आहेत.

# मुक्रमाबाद परिसरात नागरिकांची पाण्यासाठी भटकंती

मुक्रमाबाद/वार्ताहर -

ऐन एप्रिल महिन्यातच कुपनलिका आणि सार्वजनिक विहिरींना कोरड पडल्याने पंचायत समिती व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समन्वयाच्या अभावामुळे टंचाईची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे .मुक्रमाबाद व परिसरातील वस्ती तांडा येथील टँकर मजुरी , विहीर अधिग्रहण प्रस्ताव ताटकळले आहेत .यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना दिवसरात्र भटकंती करण्याची वेळ आली आहे .गोजेगाव, ईटग्याळ, मारजवाडी,कोटग्याळ,रावी, हाळणी,गोणेगाव तसेच आसपास चे वस्ती तांडा परिसरातील ग्रामस्थांना शेतातील विहिरींचा आधार घ्यावा लागत आहे.शासनाने मुखेड तालुका दुष्काळ ग्रस्त जाहीर केला असूनही दुष्काळ ग्रस्ताच्या उपाय योजना अजुनही कागदावरच आहेत . येथील नागरिक मोटार सायकलवर , बैलगाडीच्या सहाय्याने ड्रम-ड्रम पाणी शेतातील विहिरीवरून व बोअरवेलमधुन आणत असल्याचे चित्र बघावयास मिळत आहे. एप्रिल मध्ये ही परिस्तिथी तर मे महिन्यात येथे जलसंकट रौद्ररुप धारण करण्याची शक्यता वर्तविली जात असल्याने जि .प .पंचायत समिती ,तालुक्यातील लोकप्रतिनिधी शासन , प्रशासनाने तात्काळ पाणीटंचाई संदर्भात योग्य पाऊल उचलण्याची गरज आहे.मुक्रमाबाद ,गोजेगाव, ईटग्याळ,गोणेगाव,कोटग्याळ,हाळणी,रावी,बामणी, तग्याळ,सावरमाळ तसेच आसपास चे वस्ती तांडा परिसरातील रहिवाशांना सध्या जल समस्येचा सामना करावा लागत आहे. अद्यापही जि .प च्या पाणीपुरवठा विभागाने पिण्याच्या पाण्यासाठी टँकर ची सुविधा उपलब्ध करून दिलेली नाही.पाणीटंचाईची तीव्र समस्या तालुक्यात असतानाही लोकप्रतिनिधी विधानसभा निवडणुकीची मोर्चे बांधणीत व्यस्त दिसून येत आहे .या निवडणुकीच्या तोंडावर लोकप्रतिनिधीकडून केवळ आश्वासनाचा कोरडा पाऊस पहायला मिळत आहे .गोजेगाव, ईटग्याळ,मारजवाडी,कोटग्याळ,हाळणी,रावी परिसरातील नागरिक सांगतात कि पुर्वी २० ते ३० फुट खोलीवर खोदकामादरम्यान येथे पाणी लागत असे. पण आता मात्र भुगर्भातील जलपातळी खूपच खाली गेल्याचे ५०० ते ७०० फूट बोअर पाडूनही येथे पाण्याचा काही पत्ता नाही.यामुळे गावातील बहूतांश विहिरी तळ दाखवत असून काही विहिरींना कोरड पडली आहे. भविष्यातील जलसंकट लक्षात घेऊन या भागात शासकीय नियमांना फाटा देत बोअर केली जात आहे.

इतकेच नव्हे तर काही बोअर करणाऱ्यांकडून सध्या नागरिकांच्या अडचणीचा फायदाच घेतल्या जात असल्याचे दिसून येते. विहिरीला कोरड पडल्याने काहींना शेतातील विहिरींचा आधार घ्यावा लागत आहे. ज्यांची बोअर करण्याची आर्थिक स्थिती नाही अशांना तीन ते चार किमी अंतरावरून बैलगाडीवर मोठाले ड्रम लादून त्याद्वारे शेतातील विहिरींवरून पाणी आणावे लागत आहे. ऐन एप्रिल महिन्यात ही परिस्थिती असून मे मध्ये ही परिस्थिती विदारक रुप धारण करण्याची शक्यता वर्तविली जात आहे.मुक्रमाबाद परिसरातील तसेच आसपास चे वस्ती तांडा परिसरातील सार्वजनिक विहिरीला कोरड पडल्याने विहीरीतील पाणी काढण्यासाठी जिव मुठीत धरून पाणी काढावे लागत आहे .गावातील विहीर तळ गाटल्याने शेतातील विहिरीचा आधार घ्यावा लागत आहे. बैलगाडीवर ड्रम लादून त्याद्वारे पाणी आणावे लागत आहे.



## पाण्याच्या शोधात निघालेला कोल्हा विहीरीत पडला

नांदेड/प्रतिनिधी - पाणवठे आटल्याने वन्यप्राणी नागरी वस्तीकडे धाव घेत आहेत. रविवारी हिमायतनगर तालुक्यातल्या पळसपूर शिवारात पाण्याच्या शोधात निघालेला कोल्हा विहीरीत पडला.

किनवट, माहूर भागातील पैंनगंगा नदी पुर्ण आटली आहे. शिवाय अनेक पाणवठे कोरडेठाक पडले आहेत. आज पळसपुर शिवारात एका निळ जातीचा प्राणी पहावयास मिळाल्यानंतर दुपारी रेणापुर शिवारातही पाण्याच्या शोधात निघालेला कोल्हा विहीरीत पडला. कोल्ह्याला वाचविण्यासाठी पळसपूर व रेनापूर तरूणानी परिश्रम घेवून त्याला बाहेर काढले. पशु वैद्यकिय अधिकाऱ्यांनी उपचार करून त्याला जंगलात सोडले. किनवट, माहूर भागात अनेक वन्य प्राण्यांचे वास्तव्य आहेत परंतु त्यांना पिण्याचे पाणी नसल्याने ते आता शहराकडे वळु लागले आहेत.

## महाउर्जाची फसवणूक करणाऱ्या दोघांवर गुन्हा

नांदेड/प्रतिनिधी - महाउर्जाची कुठलीच तांत्रिक मान्यता न घेता खोटया लेटरपॅडवर सह्या करून महाउर्जाची फसवणूक केल्या प्रकरणी कुंडलवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शहरातील शाक्षी इंटरप्रायजेसचे मालक चैतन्य कोंडावार, प्रसाद आंभोरे यांचे आलीभाई टावर येथे एक फर्म आहे. सन २०१८-२०१९ या काळात साक्षी इंटरप्रायजेस मालक असलेल्या चैतन्य कोंडावार व प्रसाद आंभोरे या दोघांनी संगणमत करून महाउर्जा कार्यालयाची कुठलीच तांत्रिक मान्यता नसतांना महाउर्जाचे खोटे लेटरहेड छापले. त्यावर खोटया सहया करून महाउर्जाची फसवणूक केली. अशी तक्रार महाउर्जाचे विभागीय प्रभारी महाव्यवस्थापक देविदास कुलकर्णी यांनी दिल्यावरून कोंडलवाडी पोलिसांनी या दोघांविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक व्ही.एम. कांबळे हे करित आहेत.

## ट्रकच्या धडकेत युवक ठार

नांदेड/प्रतिनिधी - भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने दुचाकीला जोराची धडक दिल्याने युवक ठार झाल्याची घटना शहरातील शंकरराव चव्हाण चौक येथे शनिवारी घडली. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शहरातील पिरबुऱ्हाण येथील युवक अजय विजय राठोड (२४) व त्याचा मित्र दिपक उर्फ पाडया बालाजी कांबळे हे दुचाकी क्र.एम.एच.२६ - १२९२ वरून कामानिमित्त बाहेर गांवी जात होते. शनिवारी दुपारी २ च्या सुमारास भरधाव वेगात येणाऱ्या ट्रक क्र. एम.एच.२६ -बी.ई. - ५८९४ ने जोराची धडक दिली. या धडकेत अजय विजय राठोड हा जागीच ठार झाला तर दिपक उर्फ पांडया कांबळे गंभीर जखमी झाला. या प्रकरणी दिपक कांबळे यांनी दिलेल्या तक्रारीवरून विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक बोरचाटे ह्या करित आहेत.

## अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या महिला डॉक्टरवर गुन्हा दाखल

नादेड/प्रतिनिधी - तरोडा बु. भागातील सोनाईनगर येथे महापालिकेची कुठलीही परवानगी न घेता. अनाधिकृत बांधकाम करण्यासाठी खोदकाम करणाऱ्या एका महिला डॉक्टर विरूध्द भाग्यनगर पोलीसात शनिवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरोडा भागातील सोनाईनगर येथे गट क्र.२३४ मधील प्लॉट नं. ४/ए.४/बी.या स्वतःच्या मालमत्तेवर मंजुर नकाशाच्या विरूध्द प्लॉट क्र.४/बी. वर अनाधिकृत बांधकाम व खोदकाम करत असल्याची माहिती महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तांना मिळाली. यावरून त्यांनी घटनास्थळी जात या जागीचे मालक असलेली महिला डॉक्टर सौ. नेहा खंदारे हीस या प्लॉटवर कुठलेही बांधकाम करूनये अशी नोटीस दिली. तसेच या प्लॉटची गुंठवारी रद्द केल्याचे पत्र दिल्यानंतर डॉ. नेहा खंदारे यांनी महानगरपालिकेची कुठलीही परवानगी न घेता अनाधिकृत खोदकाम केल्याची निदर्शनास आल्यानंतर मनपाचे सहाय्यक आयुक्त विलास मटपल्लेवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून डॉ.नेहा खंदारे हिच्या विरूध्द क्षेत्रीयनगर योजनेच्या आधिनियम कलमान्वये भाग्यनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास जमादार एस.बी. फोल्ले हे करित आहेत.

## मतदानाचा फोटो फेसबूकवर टाकल्या प्रकरणी तरूणावर गुन्हा दाखल

नांदेड/प्रतिनिधी - लोकसभा निवडणूकीचे मतदान करून मतदान केलेला फोटो फेसबूकवर टाकल्या प्रकरणी एका युवकावर वजीराबाद पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड लोकसभा निवडणूकीसाठीचे १८ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्यात मतदान होते. शहरातील राहुल भुसेवाड वय ३० या तरूणाने आयुर्वेदिक कॉलेज येथे मतदान केले. राहुल भुसेवाड याने आपण केलेल्या मतदानाचे फोटो काढत फेसबुकवर टाकल्याचे दिसून आल्याने मनपाचे क्षत्रिय अधिकारी प्रकाश तुकाराम गच्चे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वजीराबाद पोलिसांनी अचारसंहिता भंगाच्या कल्मान्वये राहुल भुसेवाड विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पो.उप.नि. राठोड हे करित आहेत.

## परिवार कर्तव्य पुरस्काराचे आज वितरण

नांदेड/प्रतिनिधी- प्रख्यात कवियित्री सौ. गोदावरी गायकवाड यांच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा परिवार कर्तव्य गौरव पुरस्कार यंदा अक्षरोदय साहित्य मंडळाचे उपाध्यक्ष अनुरत्न वाघमारे आणि सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुकाराम गजभारे यांना जाहीर झाला आहे. विष्णुपुरी येथे सोमवारी (दि.२२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा संपन्न होत आहे. या निमित्त येथील बौद्ध विहारात सोमवारी (दि.२२) सकाळी दहा वाजता आयोजित भीमजयंती सोहळ्यात बौद्ध भिख्खू महाथेरो पय्याबोधी, कवीकट्टाचे प्रा. अशोक कुबडे, कवी शिवाजीराव होळकर. प्रा. वंदना मघाडे-मगरे, दत्ता वंजे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. या सोहळ्याला सर्व आंबेडकरप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजिका ज्योती गायकवाड, भीमजयंती मंडळाचे अध्यक्ष रणधीर हटकर यांनी केले आहे.

## जिल्हाध्यक्षपदी श्रीरामवार

उमरी/वार्ताहर :- अंतरराष्ट्रीय मानवअधिकार सुरक्षा परिषदे चे राष्ट्रीय अध्यक्ष मा.संदीप.बी.शर्मा अंतरराष्ट्रीय मानवअधिकार सुरक्षा परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशध्यक्ष मा. संतोषजी बजाज सर,महाराष्ट्र मुख्यसंघटन महासचिव महंत विलास भारती महाराज यांच्या यांच्या मार्गदर्शना खाली मा. रूपेशकुमार ऊर्फ दादासाहेब श्रीरामवार याची अंतरराष्ट्रीय मानव अधिकार सुरक्षा परिषदेच्या नांदेड जिल्हाध्यक्ष पदी निवड केली. या निवडी बदल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

**कागदपत्र हरवले**

कु. स्मिता अशोकराव लहाने रा. किनगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर या नावाची मूळ जातीचे प्रमाणपत्र (वंजारी-३० जातीचे) बसस्थानक शेजारी किनगाव येथे १०.३.२०१८ रोजी घरसामान घेवून जाताना हरवले आहे.

**संपर्क : ९४२१३६९०३८**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक प्रा. रामेश्वर गिरीधारीलाल बद्दर, रेणापूरकर यांनी देवाशिष निवास, विशाल नगर, लातूर यांनी सुंदर प्रिंटर्स, औद्योगिक वसाहत लातूर येथे छापून देवाशिष निवास, विशाल नगर, येथून प्रकाशित केले. मुख्य संपादक प्रा. रामेश्वर गिरीधारीलाल बद्दर, रेणापूरकर.
RNI No. MAHMAR/2008/27526 - No. L2/67/RNP/OSD-84/12-14 फॅक्स २५००२०. मो. ९४२२६१२४९६, ९८९०३९९९९९, लातूर कार्यालय - (०२३८२) २५००२० - E-mail : marathwadaneta@gmail.com - www.marathwadaneta.com

# मराठवाडा नेता

● लातूर ● सोमवार, दि. २२ एप्रिल २०१९



## संपादकीय....

### न्यायपालिकेला धोका

देशात सत्ता कोणाची असावी याचा निर्णय जनतेने केला पाहिजे हे तत्त्व घटनाकारांनी मानले आहे. त्यासाठी निवडणुका आहेत आणि त्यातून जनता ज्याला आदेश देईल तो देशात सत्ताधारी होतो. हे सर्वसाधारण गणित आपल्याला माहीत आहे पण हा निर्णय घेणाऱ्या भोळ्या भाबड्या लोकांना माहीतही नसतील अशी चार दोन कारस्थानी माणसे दिल्लीत बसून असे काही कट रचत असतात की त्यांच्या कारस्थानातून सत्तेला हादरे बसू शकतात. ज्यांना जनतेची मते जिंकून सत्ता मिळवता येत नाही ते लोक अशी कारस्थाने रचत असतात. ज्यांना सत्तेची चटक लागलेली असते आणि नंतर काही निमित्ताने ती गमवावी लागते असे लोक सत्तेविना तडफडत राहतात. पाण्याबाहेर काढलेल्या मासळीप्रमाणे त्यांची अवस्था होते. ते सगळे सत्तेतच असतात असे नाही त्यातले काही लोक सत्तेचे अवाजवी फायदे लाटत असतात आणि आपल्या मालकांची सत्ता जाऊन ते फायदे मिळेनासे झाले की त्यांचीही तडफड व्हायला लागते.

सत्तेचा असा फायदा मिळवून दिल्लीच्या ल्यूटेन्स भागातले करोडो रुपयांचे सरकारी बंगले नाममात्र भाड्याने घेऊन दिल्लीत ठाण मांडलेल्या अशा लोकांना मोदी सरकारने हे बंगले सोडायला लावले आहेत. खोटी कारणे सांगून बंगले बळकावून बसवलेल्या अशा १५०० बुद्धिमतांना मोदींनी अनेक वर्षे ताब्यात असलेले हे बंगले कायद्यानुसार सोडायला लावले आहेत आणि दिल्लीत वरच्या स्तरावर सरकारला अस्थिर करण्याची ताकद असलेले १५०० शत्रू निर्माण करून ठेवले आहेत. त्यांची कारस्थाने नित्य चाललेली असतात. काहीही होऊ द्या, कोणी मंदबुद्धी बालक सत्तेवर येऊ द्या पण मोदीला हटवा असा त्यांचा नारा आहे त्यामागचे इंगित हे आहे. मात्र त्यासाठी ते जनतेचा उठाव घडवू शकत नाहीत. त्यांनी न्यायालयाच्या माध्यमातून मोदी सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न चालवला आहे. दोन वर्षांपूर्वी सरन्यायाधीश न्या. दीपक मिश्रा यांच्या विरोधात चार न्यायमूर्तींनी पत्रकार परिषद घेतली. हा एका कारस्थानाचा भाग होता. काही न्यायाधीश मोदी सरकारला अडचणीत आणण्याचे निर्णय देण्यास आतुर होते. काही वेळा सर्वोच्च न्यायालयाचा एखादा निर्णय सरकारला हादरा देऊ शकतो. तसा हादरा देण्यास आतुरलेले हे न्यायमूर्ती होते पण त्यांना तसा हादरा देणारे खटले मिळत नव्हते. त्यामुळे ते नाराज होते. त्यांनी पत्रकार परिषद घेतली पण शेवटी त्यांची मागणी काही योग्य नव्हती हे दिसून आले.

काहीही दिसून आले असले तरीही, विरोधकांना, या देशात काय चालले आहे, न्यायमूर्तीही नाराज आहेत असे वातावरण तयार करण्याची एक संधी मिळाली. काही पत्रकारांनी केवळ याच एका मुद्यावरून सरकारला ताडण्याची भूमिका घेतली पण सरकारची काही चूक नव्हती. आता सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्या. रंजन गोगोई यांच्यावर एका महिलेने लैंगिक अत्याचाराचा आरोप लावला आहे. अशा प्रकारे सरन्यायाधीशांनाच का लक्ष्य केले जाते याचा विचार केला पाहिजे. न्या. रंजन गोगोई यांनी आपल्या बँक खात्यात केवळ सहा लाख ८० हजार रुपये असल्याचे जाहीर केले आहे आणि आपली मालमत्ताही जाहीर केली आहे. आपल्याला विकत घेण्याचे प्रयत्न झाले पण ते फसले त्यामुळे आता असा खालच्या दर्जाचा आरोप करण्यातून बदनाम करण्याचा प्रयत्न आहे असा त्यांचा दावा आहे. त्यात तथ्य आहे कारण आता न्यायमूर्तींनी काँग्रेस पक्षाची गोची केली आहे. राफेल प्रकरणात मोदींची बदनामी करण्याचा राहुल गांधी यांच्या कारस्थानाला याच न्यायमूर्तींनी सुरुंग लावला आहे. राहुल गांधी कितीही ओरडत असले तरी याच न्यायालयाने या प्रकरणात मोदी सरकारला क्लीन चिट देऊन राहुल गांधींना तोंडघशी पाडले आहे.

मोदी सरकारवर गेल्या पाच वर्षात एका पैशाचाही भ्रष्टाचार केल्याचा आरोप नाही. त्यामुळे काँग्रेसला त्यांच्या विरोधात प्रचार करायला काही मुद्दाच राहिलेला नाही. म्हणून राहुल गांधी यांनी राफेलचा धुरळा उडवायचे ठरवले पण न्यायालयाने त्यांच्या आरोपात तथ्य नसल्याचे जाहीर केले. एकदा न्यायालयानेच निर्णय दिला की आरोपात काही अर्थ रहात नाही. त्यामुळे न्या. रंजन गोगोई हे काँग्रेस नेत्यांच्या रोषास कारणीभूत ठरले आहेत. आता तर याच न्यायालयाचा राफेल प्रकरणात अवमान केल्याचा आरोप राहुल गांधी यांच्यावर लागला आहे. त्याची सुनावणी दोन दिवसात होणार आहे. या प्रकरणात राहुल गांधी यांना राफेल प्रकरणात न्यायालयाची माफी मागावी लागणार आहे. तशी ती मागावी लागली तर राहुल गांधी यांना राजकारणात मोठा धक्का बसणार आहे. हे प्रकरण त्यांच्या अंगलट येण्याच्या बाबतीत इतके निर्विवाद आणि नि:संदिग्ध आहे की माफी शिवाय काहीही पर्याय नाही. त्यातच आता राहुल गांधी ब्रिटीश नागरिक की भारतीय नागरिक असा एक नवा वाद निर्माण झाला आहे. सुब्रमण्यम स्वामी यांच्या मते या वादात तर राहुल गांधी फारच अडचणीत येणार आहेत. राहुल गांधी यांच्या राजकीय कारकीर्दीची कबर खोदणारे तीन निर्णय न्या. रंजन गोगोई यांच्या हातात आहेत. त्यांच्यावर अचानक पणे झालेल्या या खालच्या स्तरावरच्या आरोपाचे रहस्य यात दडलेले आहे.

# अवैध वृक्षतोडीमुळे सावली झाली गायब



**औंढा नागनाथ / प्रतिनिधी :.... उष्णतेचा पारा दिवसेंदिवस आग ओकत आहे. झळझळत्या उन्हाच्या तडाख्यापासून स्वरक्षणाचे उपाययोजना सर्वच नागरिक करतात. कुठेतरी झाडाच्या सावलीचा आश्रय घ्यावा असे वाटत असते. परंतु झाडाच्या सावलीचा शोध घेतला तरी झाडे मात्र वृक्षतोडीमुळे गायब झाले असे विदारक चित्र औंढा तालुक्यात सर्वत्र पहावयास मिळत आहे.**

राष्ट्रीय विकासाच्या नावाखाली रस्त्याची बांधणी, पूल बांधकाम, तळे, बंधारे, विजेचे खांब उभारणे, विद्युत तारा ना अडचणीच्या कारणाने व वाऱ्यावावधानाने झाडे कोलमडून पडणे. तर कुठे गावाचा विकासाच्या नावावर अवैध वृक्षतोड झाली आहे. त्या अनुषंगाने नवीन वृक्ष लागवड तसेच संवर्धन झाल्याचे दिसून येत नाही. कोट्यावधी रुपयातून झाडाचे लक्ष्यांक पूर्ण झाल्याचे दाखविल्या जात आहे. अवकाळी पाऊस, वादळ, गारपीट, अतिवृष्टी होत आहे. प्रदूषणात वाढ होत असल्याने पाण्याची पातळी खाली जात आहे. नवीन आजारांना पाय फुटले आहे.

घरातून बाहेर पडल्यानंतर झाडाखाली थांबावे अशी इच्छा होते. पण झाडेच मिळेनाशी झाल्याने आता लोकांना झाडाचे महत्त्व समजू लागले आहे. वन विभागांतर्गत गेल्या वीस ते पंचवीस वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड होत आहे. त्यामुळे चुकून एखादं झाड दिसले की जनावरेसुद्धा त्या झाडाखाली दाटीवाटीने उभे असल्याचे दिसून येते. सध्या मशागतीचे काम सुरू झाले असून दुपारच्या वेळेस झाडाखाली थाबण्याची इच्छा होते. आराम करण्यासाठी झाड शिल्लक राहिले नाही. अशी चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वनविभागाकडून हरितक्रांती निर्माण करण्याच्या दृष्टीने वृक्ष लागवडीवर शासन कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. झाडे मात्र जगल्याचे दिसून येत नाही. झालेला खर्च व्यर्थ गेला आहे. एकीकडे दरवर्षी शासनाकडून वृक्षलागवड मोहीम मोठ्या प्रमाणात राबवण्यात येते. या मोहिमेवर लाखो रुपये खर्च केले जातात. तर दुसरीकडे झाडांची सर्रास कत्तल सुरू आहे. याप्रकाराकडे संबंधितांचे दुर्लक्ष होत असताना पर्यावरणाचे संतुलन दिवसेंदिवस बिघडत चालले आहे. उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात उष्णतामान वाढत असल्यामुळे जो तो सावलीच्या शोधात आहे. परंतु रस्ता चौपदरी करण्याच्या नावाखाली ही वृक्षतोड झाल्यामुळे रस्त्यावर कुठेही वाहन थाबवण्यासाठी सावली मिळेनाशी झाली आहे .ही चिंतेची बाब पुढे येत आहे.

## आर्ट ऑफ लिव्हिंगचे विशेष शिबीर

अंबाजोगाई / प्रतिनिधी :....

येथील आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने वय वर्षे १८ पासून पुढील सर्व वयोगटासाठी तसेच युवकांसाठी विशेष आनंद वर्गाचे आयोजन दिनांक २४ ते २८ एप्रिल २०१९ या दरम्यान करण्यात आले आहे.या वर्गाच्या पूर्वनोंदणीसाठी समाजातील सर्वच घटकांतून येणाऱ्या व्यक्तिंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगचे सुप्रसिद्ध युवा प्रशिक्षक चिराग दादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि प्रशिक्षणाखाली हा वर्ग संपन्न होणार आहे.

एक आंतरराष्ट्रीय युवा प्रशिक्षक म्हणून प्रसिद्ध असलेल्या चिराग दादांच्या स्वागतासाठी अंबाजोगाई येथील आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार यावर्षीही पूर्ण तयारीनिशी सज्ज आहे. अंबाजोगाई शहरातील हॅप्पीनेस सेंटर, योगेश्र्वरी नुतन विद्यालय, प्रशांतनगर या ठिकाणी

दिनांक २४ ते २८ एप्रिल या कालावधीत हे शिबीर होत आहे. आनंद अनुभूती शिबीर हे सर्वांसाठी खुले आहे. हे शिबीर सकाळी ६ ते ९ या वेळेत तर फक्त युवकांसाठी 'युवा आनंद शिबीर' हे सायंकाळी ५.३० ते रात्री ८.३० या वेळेत होईल. वय वर्षे १८ ते ३५ गटातील युवकांना या शिबीरात सहभागी होता येईल.

# पैसा विवेकाने कमविला पाहिजे

**ह.भ.प. अरविंद जोशी**

अक्कलकोट / प्रतिनिधी :....

पैशाने सर्व सुख मिळत नाही असे म्हणणे चुकीचे नाही. परंतु पैसा विचारपूर्वक मिळविला आणि औदार्याने खर्च केला तर तो सर्व प्रकारच्या सुखास पुरक ठरतो असे प्रतिपादन सोलापूर येथील ज्येष्ठ पत्रकार ह.भ.प. अरविंद जोशी यांनी केले.

ते येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४१ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या धर्मसंकीर्तन महोत्सवातील प्रथम पुष्प गुंफतांना बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री वटवृक्ष मंदिर समितीच्यावतीने मंदिर समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे व संयोजक डॉ. हेरंबराज पाठक यांनी हभप अरविंद जोशी यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला.

पुढे बोलताना जोशी यांनी पैसा म्हणजे जीवन जगण्याचे एक साधन असून मनुष्य पैशाने आयुष्यातील सर्व भौतिक सुखांचा लाभ घेवू शकतो. परंतु अंतर आत्म्याच्या सर्वांगिण सुखाकरिता भक्ती मार्गच महत्त्वाचे कार्य बजावते, त्यामुळे मनुष्याने आयुष्यात पैसा कमविण्यासोबतच आंतरआत्म्याच्या मन:शांतीकरीता भक्ती मार्गावर चालून जीवन सुखी समाधानी करावे, असेही निरुपण ह.भ.प. अरविंद जोशी यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी धर्मसंकीर्तन महोत्सवाचे संयोजक डॉ. हेरंबराज पाठक यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. याप्रसंगी वटवृक्ष मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे, पुरोहित मोहनराव पुजारी, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त विलासराव फुटाणे, महेश गोगी, संपतराव शिंदे, उज्वलाताई सरदेशमुख, शुभांगी पाठक, बाळासाहेब मैंदर्गीकर, शंकरराव पवार, संजय बडवे, विजयकुमार कडगंची, चंद्रकांत गवंडी, बाळासाहेब घाटगे,



मल्लीनाथ स्वामी, महादेव तेली, अरविंद कोकाटे, प्रशांत गुरव, गणेश दिवाणजी, श्रीनिवास इंगळे, गिरीश ग्रामोपाध्ये, संतोष पराणे, स्वामीनाथ लोणारी, गिरीश पवार, मच्छिंद्र काळे, अविनाश क्षीरसागर, अक्षय सरदेशमुख, संजय पाठक, प्रा. शिवशरण अचलेर, दिपक जरिपटके, संजय पवार, सागर गोंडाळ, महेश मस्कले, प्रसाद सोनार, महेश काटकर, काशिनाथ इंडे, रविराव महिंद्रकर, विपुल जाधव आदींसह हजारो स्वामी भक्त उपस्थित राहून या प्रवचन सेवेचा लाभ घेतला.

# सर्व धार्मिय सामुहिक विवाह सोहोळा संपन्न



सांगवी काटी, दि. २१ :....

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील सरस्वती विद्यालयाच्या प्रांगणात आकरा झोडप्यांचा विवाह पार पडला. मागील सलग तीन वर्षापासून कै. दमयंती हरिदास जगदाळे प्रतिष्ठान नळदुर्ग यांच्या वतीने या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या विवाह सोहळ्याचे यंदाचे तिसरे वर्ष आत्ता पर्यंत कै दमयंती हरिदास जगदाळे प्रतिष्ठानच्या वतीने ४० झोडप्यांचे विवाह लावण्यात आले आहेत. या विवाह सोहळ्यामध्ये तामलवाडी परिसरातील शेतकऱ्यांच्या मुला मुलींचे विवाह होत आसल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा मिळाला आहे. या मुळे तामलवाडी परिसरातील शेतकऱ्यांकडून कै. दमयंती प्रतिष्ठानचे अध्यक्ष आशोक भाऊ जगदाळे यांचे कौतुक होत आहे.या विवाह सोहोळ्यासाठी प्रमुख उपस्थितीत म्हणून तुकाराम महाराजांचे वंशज श्री. कान्होबा महाराज हे उपस्थित होते. यावेळी काँग्रेस चे माजी जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब पाटील, तुळजापूर बाजार समितीचे संचालक यशवंत आण्णा लोंढे, पंचायत समितीचे सदस्य दत्तात्रय (भैय्या )शिंदे, तामलवाडीचे सरपंच ज्ञानेश्र्वर माळी, पांगरधरवाडीचे सरपंच विजय निंबाळकर, बालाजी डोंगरे, धोत्रीचे सरपंच आप्पा रावळे, पत्रकार सर्जेराव गायकवाड, सांगवी काटी चे सरपंच नागनाथ मगर, व तामलवाडी परिसरातील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

## नगर-पुणे मार्गावर झालेल्या अपघातात ४ ठार, २ जखमी

नांदेड/प्रतिनिधी - चार चाकी वाहनातून पुण्याकडे निघालेल्या चौघाजणांचा नगरपुणे मार्गावर अपघात होवून चौघेजने जागीच ठार झाल्याची घटना रविवारी पहाटे शिरूर येथे घडली आहे.अपघातात मृत झालेले चारही जन लोहा तालुक्यातील रामतीर्थ येथील असल्याची माहिती शिरूर पोलीस स्थानकाचे पी.एस.ओ. कोकरे यांनी दिली. या अपघातात २० दिवसाच्या बाळाचा मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले.

लोहा तालुक्यातील रामतीर्थ येथील हाके कुटूंबिय पुणे येथील रायसोनी कॉलेज वाघोली येथे वास्तव्यास आहेत. आपल्या नवजात बालकाला घेवून जाण्यासाठी पुण्यावरून आपल्या चारचाकी वाहन क्रं. एम.एच. १२ क्यु डबल्यु.८५०२ या कारने नांदेड जिल्हयात आले होते. ते शनिवारी सायंकाळी पुणे येथे निघाले असता नगर-पुणे महा मार्गावर पाचरने माळाकडे जाणार्या चढावर एका उभ्या असलेल्या कंटेनरला मागून जोराची धडक दिली. ही घटना रविवारी पहाटे ४ च्या सुमारास घडली.या अपघातात किशोर माधव हाके वय ३२, लिंबाजी उर्फ शुभम माधव हाके वय २५, विमलबाई माधव हाके वय ६० वर्ष व २० दिवसाचे बाळ ठार झाले आहे. तर या घटनेत पुष्पा किशोर हाके वय २५, समृध्दी बजरंग हालगुडे वय ४ वर्ष हे गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी शिरूर पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा अधिक तपास शिरूर पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक एन.एम. सारंकर हे करित आहेत. या घटनेने लोहा तालुक्यातील रामतीर्थ येथे शोककळा पसरली आहे.

## जलजागृती

उन्हाळा चालू झाला कि पाण्याची कमतरता जानवते आणि चालू होतो आरडा ओरडा. मग त्याचा राग आवळतो सरकारवर किवा स्थानिक प्रशासनावर. नऊ - दहा महिने ज्याकडे आपण दुर्लक्ष करतो, ज्यांचा आपला काही संबंध नाही असे आपले वर्तन असते. निसर्ग आपणास पावसाचे स्वरुपात हजारो कोटी रुपयांचे पाणी अगदी फुकट देतो . परंतु एखादी गोष्ट फुकट मिळाली कि आपल्याला त्याची किंमत नसते हे आपल्या पाणी पुर्नभरण न करण्याच्या कृतीमुळे, आपण पाण्याची जी नासाडी करतो, पाणी बचतीचे तंत्र आपण स्विकारत नाही यासर्व गोष्टीवरून खरे दिसते. पावसाचे पडलेले पाणी आपण किती अडवतो, पृथ्वीरूपी वॉटर बँकमध्ये किती जिरवतो, पुर्नभरण करतो व किती वाहून जाते. वाहून जाणा-या पाण्याची टक्केवारी हि ५० पेक्षा जास्त आहे. आपल्याकडे पाण्याची साठवण पध्दती, वितरण पध्दत व वापर याबाबत जे नियोजन आहे ते बदलण्याची गरज आहे. पाण्याकडे राष्ट्रीय जलसंपत्ती म्हणून पाहण्याची दृष्टी येत नाही तोपर्यन्त पाणी मौल्यवान आहे हे मान्य करायला तयार होत नाही, यांचे महत्वाचे कारण आहे अलिप्तता व जलअशिक्षितता.

पाणी या विषयावर प्राथमिक शाळेपासून एक स्वतंत्र विषय म्हणून शिकविला पाहिजे. पाणी हा विषय अभ्यास क्रमात सक्तीचा केला गेला पाहिजे. विदेशात पाणी हा विषय शिकवला जात असून त्यांच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय पातळीवर होणार्या पाणी परिषदेत प्राधान्याने सामील करण्यात येत असते. पाणी प्रश्र्नाकडे फक्त उन्हाळयात पाणी कमी आले म्हणून पाहणे यापुढे परवडणारे नाही. देशांचा एक नागरीक म्हणून आपण आपले कर्तव्य पाळतो का? पाणी हेच जीवन आहे हे मान्य करावे लागेल. पाणी असेल तर जीवन जगतां येईल म्हणूनच पाणी वाचवा - जीवन जगवा हा संदेश महत्वाचा आहे. जल ही राष्ट्रीय संपत्ती असल्याने ती आपण जपणे आपले कर्तव्य आहे. हे कर्तव्य समजण्यासाठी आवश्यक असलेली जलसाक्षरता, जागृतपणा आपण स्विकारलेला नाही. जल साक्षरतेचे कार्य झाले पाहिजे . पाणी हा सध्या ज्वलंत झालेला विषय सोडविण्यासाठी प्रत्येकाने आप आपल्या परीने कार्य करावे. चला संकल्प करू या पाणी बचतीचा, पाणी पुर्नभरणाचा, प्रत्येकाला समान पाणी मिळण्याचा.

## थोडक्यात

### चाकुचा धाक दाखवत ५१ हजार रुपये लंपास

वसमत / प्रतिनिधी

येथील चैतन्य नगरात चाकु चा धाक दाखवून ५१ हजार रूपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना २० एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास घडली. या प्रकरणी तिघांवर वसमत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार वसमत येथील चैतन्य नगर भागात प्रविण विनायकराव इंगळे यांचे घर आहे. इंगळे यांचे कुटूंबिय मतदानासाठी बाहेरगावी गेले होते. २० एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी घराच्या दरवाजावर लाथ मारून दरवाजा तोडला अन घरात प्रवेश केला. यावेळी मोठा आवाज झाल्याने इंगळे जागे झाले. मात्र घरात प्रेवश केलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्याला चाकू लाऊन शांत बसण्यास सांगितले. अचानक झालेल्या प्रकारामुळे इंगळे घाबरून गेले. त्यानंतर चोरट्यांनी घरातील सोन्याच्या अंगठ्या, लहान मुलाचे सोन्या चांदीचे दागिने तसेच सोडनऊ हजार रूपये रोख असा ५१ हजार रूपयांचा ऐवज पळविला. त्यानंतर इंगळे यांनी या घटनेची माहिती तातडीने वसमत शहर पोलीसांना दिली. शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक रविंद्रसिंग धुन्ने, सहाय्यक पोलीस निरीक्षक आझम, उपनिरभक्षक मराडे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देवून पाहणी केली.

### शाळेतून ३१ हजारांचे संगणक चोरीला

वसमत / प्रतिनिधी

तालुक्यातील कुरूंदा येथे नरहर कुरूंदकर उच्च माध्यमिक विद्यालयातून ३१ हजार ४०० रूपये किमतीचे संगणक साहित्य चोरीला गेल्याची घटना घडली आहे. दि. १६ एप्रिल ते २० एप्रिलच्या दरम्यान ही घटना घडली असून शाळेतून अज्ञात चोरट्यांनी ३१ हजार ४०० रूपयांचे संगणक साहित्य चोरून नेले आहे. येथील कॉम्यूटर लॅबचे लोखंडी रॉडने दरवाजे कुलूप तोडून ही चोरी करण्यात आली आहे. शाळेचे मुख्याध्यापक बबन भुजंगराव महत्रे यांच्या फिर्यादीवरून कुरूंदा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### सेनगाव तालुक्यातील शेतकरी पंचनाम्याच्या प्रतिक्षेत

हिंगोली / प्रतिनिधी

जिल्ह्यातील काही भागात १७ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह गारपीट झाली होती. त्यामध्ये सेनगाव तालुक्यातील डाळींब व केळी बागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या घटनेला पाच दिवस उलटूनही प्रशासनाने कोणताही पंचनामा न केल्याने शेतकरी चिंतेत सापडले असून प्रशासनाचे दुर्लक्ष समोर आले आहे.

यंदा झालेले अत्यल्प पर्जन्यमान व त्यानंतरचा दुष्काळ यामध्ये शेतकरी होरपळला आहे. मागील आठवड्यात जिल्हाभरात अवकाळी पावसासह गारपीटीचा मोठा फटका बसला. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांनी शिजवून टाकलेल्या हळदीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याच बरोबर आंबा बागेलाही याचा फटका सहन करावा लागला. तसेच सेनगाव तालुक्यातील वाघजाळी येथील प्रकाश नारायण गांधीले यांच्या केळी बागेला याचा फटका बसला असून लाखो रूपये खर्च केलेले ३०० केळीचे झाडे या वादळी वाऱ्यात भुईसपाट झाले आहे. तसेच खडकी येथे डाळींब बागेची यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या अवकाळीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असला तरी प्रशासनाच्यावतीने मात्र अद्याप पर्यंत त्या नुकसान भरपाईची दखल घेण्यात आली नाही. लोकसभेच्या निवडणूक कामात व्यस्त असलेल्या प्रशासनाला निवडणूक होवून तीन दिवस उलटले असले नुकसान भरपाईच्या पंचनाम्यासाठी मुहूर्त मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. अवकाळी पावसामुळे झालेल्या केळी, डाळींब, आंबा फळबागेचे पंचनामे करून तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांतून होत आहे.

### ज्येष्ठांसाठी गीतरामायण व गीतगोपालाचे आयोजन

नांदेड / प्रतिनिधी :....

गीतरामायण व गीतगोपाल ही खरे तर शब्दप्रभू ग.दि.माडगूळकरांची सुश्राव्य अशी अपत्ये, परंतु यातील गीतगोपाल अनेकांना अपरिचित असण्याचीच शक्यता अधिक. शब्दप्रभूंचे हे अप्रतिम काव्य ज्येष्ठ नागरिकांसमोर यावे या शुद्ध हेतूने कलामंदीरच्या गंधर्वनगरीत दि.२८ एप्रिल २०१९ रोजी रविवारी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत यवतमाळचे सुप्रसिद्ध गायक प्रभाकरराव देशपांडे व त्यांचा संच गीतगोपाल सादर करीत आहे.

रसिकांच्या आनंदात बाधा येऊ नये म्हणून सर्व ज्येष्ठ नागरिक संघ व मराठवाडा साहित्य परिषद, नांदेडच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत हा कार्यक्रम मुद्दाम निशुल्क ठेवला आहे.

# नागरी सुविधांसाठी महिलांनी दिले बिडीओंना निवेदन



हिंगोली / प्रतिनिधी

शहरापासून जवळच असलेल्या सुराणा व रघूनंदन नगरातील रहिवाशांना ग्रामपंचायतीच्या वतीने कुठल्याही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नसल्याने शनिवारी या भागातील म हिलांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देत सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

सुराणा व रघूनंदन नगरात लोकवस्ती वाढत आहे. लोकसंख्या वाढत असली तरी लोकसंख्येच्या प्रमाणात ग्रामपंचायतीच्यावतीने देण्यात येणाऱ्या सुविधा मात्र दिल्या जात नसल्याने या भागातील नागरीकांची मोठी गैरसोय होत आहे. अजूनही काही ठिकाणी पक्का रस्ता नाही, नाल्याही काढण्यात आल्या नाही. लाईटची व्यवस्था करण्यात आली नसल्याने या भागातील ग्रामस्थांची अडचण वाढली आहे. ठिकठिकाणी खड्ड्यामध्ये पाणी साचून नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या दोन्ही भागात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात अशी मागणी गटविकास अधिकाऱ्याकडे करण्यात आली आहे. निवेदनावर रंजना पाईकराव, सुषमा जाधव, ज्योती जाधव, सारीका येलगुंडे, मिनाक्षी रत्नाकर, अनुसया कल्याणकर यांच्यासह महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ट्रक उलटून अपघात

## एक ठार, एक जखमी

हिंगोली / प्रतिनिधी

शहरालगत अकोला वळण रस्त्यावर ट्रक उलटून झालेल्या अपघातात एक जण ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली असून हिंगोली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार गुजरात राज्यातून एका ट्रकमध्ये प्लायवूड घेऊन हैदराबादकडे नेले जात होते. सदर ट्रक १८ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास हिंगोली शहरालगत अकोला वळण रस्त्यावर आला होता. यावेळी चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक रस्त्यालगत उलटला. या अपघातात ट्रक चालक खमानसिंह हनुमानसिंह राठोड व संजयसिंह दीपकसिंह शेखावत हे दोघे प्लायवुडखाली सापडले. अपघात झाल्याचे कळताच परिसरातील नागरीकांन घटनास्थळी धाव तातडीने प्लायवूड बाजूला करून संजयसिंह यांना उपचारासाठी शासकीय रूग्णालयात दाखल केले. तर खमनसिंह यांचा जागेवरच मृत्यू झाला होता.

अपघात प्रकरणी संजयसिंह यांच्या तक्रारीवरून हिंगोली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड, उपनिरीक्षक नितीन केणेकर पुढील तपास करीत आहेत.

## गुरूवारी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व तपासणी शिबीर

हिंगोली / प्रतिनिधी

अजित मगर मित्र मंडळ, उदयगिरी लायन्स नेत्र रूग्णालय उदगीर, जीवनसाधना फाऊंडेशन, व्हीजन फाऊंडेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने २५ एप्रिल रोजी सकाळी ११ ते ४ यावेळेत औंढा नागनाथ येथील भक्तनिवास २ मध्ये मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया, श्रवणयंत्र वाटप व मधुमेह तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

अपक्ष जिल्हा परिषद सदस्य अजित मगर यांनी मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया, श्रवणयंत्र वाटप व मधुमेह तपासणी शिबीराचे आयोजन केले आहे. हे शिबीर गुरूवारी २५ एप्रिल रोजी औंढा नागनाथ येथील भक्तनिवास २ मध्ये होणार आहे. सकाळी ११ ते ४ पर्यंत हे शिबीर होणार आहे. या शिबीराची नाव नोंदणी प्रसाद अंभोरे, प्रा.यशवंत कदम यांच्याकडे सुरू असून अजित मगर यांनी यापुर्वी कळमनुरी, बाळापूर आदी ठिकाणी आरोग्य शिबीर घेतले आहे. या शिबीरांनाही मोठा प्रतिसाद मिळाला होता. औंढा नागनाथ येथे होऊ घातलेल्या या शिबीरासाठी ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. शिबीरात सहभागी होणाऱ्या रूग्णांनी येताना आधारकार्ड, मतदान कार्ड व मुक्कामासाठी लागणारे आवश्यक साहित्य घेऊन यावे व अधिकाधिक गरजू रूग्णांनी या शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन अजित मगर मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मोकाट जनावरे नव्हे, हे तर स्पीड ब्रेकर!

हिंगोली / प्रतिनिधी

वर्षापासून नगर पालिकेचा कोंडवाडा बंद असल्याने मोकाट जनावरांनी हिंगोली शहरातील चौकाचौकात आपले ठाण मांडले आहे. हिंगोलीकरांना या मोकाट जनावरांचा नाहक त्रास सहन करावा लागतो. ठिकठिकाणी रस्त्याच्या मधोमध बसत असलेले हे मोकाट जनावरे हिंगोलीकरांसाठी स्पीड ब्रेकर झाले आहेत.

काही महिन्यांपुर्वी नगर पालिकेने शहरात फिरणाऱ्या मोकाट जनावरांना बंदोबस्त घालण्यासाठी पशुमालकांवर कार्यवाही केली होती. त्यांच्याकडून दंडही वसूल करण्यात आला होता. ही मोहिम काही दिवस जोरात सुरू होती पण नंतर ही मोहिम थंडावल्याने पुन्हा जनावरांनी आपले बसस्थान रस्त्याच्या मधोमध बसविले आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या गांधी चौकात १० ते १५ जनावरांचे कळप ठाण मांडून असल्याने पादचाऱ्यांना याचा त्रास सहन



करावा लागत आहे. त्याचबरोबर दुचाकी व चारचाकी वाहनांनाही यातून मार्ग काढावा लागत आहे. बाजारात राहून निर्ढावलेल्या या जनावरांना आता कोणताच परिणाम जाणवत नाही. त्यातच गांधी चौकात फळविक्रेत्यांनी केलेले अतिक्रमण हिंगोलीकरांच्या मुळावर उठले आहे. फळविक्रेते चक्क रस्त्यामध्ये आपले गाडे लावून व्यापार करत असल्याने रहदारीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्याचबरोबर ही जनावरे इंदिरा चौक, नांदेड नाका, पिपल्स बँक यासह आदी ठिकाणी राजेरासपणे वावरताना दिसतात. नगर पालिकेने हा विषय गांभीर्याने घेऊन या मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी हिंगोलीकरांतून पुढे येत आहे.

# सर्वधर्मीय धर्मगुरूंची शिबीरात आरोग्य तपासणी



वसमत / प्रतिनिधी

राज्य शासनाचे आरोग्य विभाग गरीब रूग्णांना आरोग्य सेवा देण्यात असमर्थ ठरत असतानाच अमन सेवाभावी संस्थेच्या वतीने सुरू करण्यात आलेले मोफत आरोग्य सुविधा गरीब रूग्णांना वरदान ठरत असून हा स्त्युत्य उपक्रम म्हणजे म नवतेचा संदेश देणारा उपक्रम असल्याचे प्रतिपादन माजीमंत्री तथा राज्य साखर संघाचे अध्यक्ष जयप्रकाश दाडेगांवकर यांनी २१ एप्रिल रोजी आयोजित शिबीराप्रसंगी केले.

येथील अमन सेवाभावी संस्थेच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आरोग्य मेळाव्यात सर्वधर्मीय धर्मगुरूंचे मोफत आरोग्य तपासणी शिबिर व डेथ फ्रिजरबॉक्स, ऑक्सीजन सेवेचा शुभारंभ उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लासिन मठाचे मठाधिपती करबसव शिवाचार्य म हाराज यांची तर प्रमुख पाहुणे म्हणून माजीमंत्री तथा राज्य साखर संघाचे अध्यक्ष जयप्रकाश दांडेगांवकर, आ. डॉ.जयप्रकाश मुंदडा, नगराध्यक्ष श्रीनिवास पोराजवार, उपनगराध्यक्ष खैसर अहेमद, जमाते इस्लामी हिंदचे अ.माजीद खान, महंत खेडकरबाबा, ब्रम्हकुमारी अरूणा दीदी, वसमत गुरूद्वाराचे ग्रंथी परमिंदरसिंग, वसमत चर्चचे प्रमुख डेव्हिड पैठणे, भन्ते पुर्णबोधी, मौलाना बासित कासमी, मौलाना मोबिन सिद्दीकी, पोलीस निरिक्षक रविंद्रसिंग धुन्ने आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष फेरोज पठाण, संचलन प्रकाश इंगळे तर आभार मिर्झा अमजद बेग यांनी मानले. कार्यक्रमासाठी अमोल पटवे, अमजतखान नमू, गणेश पालिमकर, ऋषिकेश देशमुख, एन.आय.पठाण, गणेश संवडकर, माजीत सिद्दीकी, शेख महेबूब, संदिप वरवंटे, रमेश मानवते यासह संस्थेच्या सदस्यांनी पुढाकार घेतला होता.

## ७ मे रोजी वसमत येथे १०१ जोडप्यांचा सामुहिक विवाह सोहळा संपन्न होणार

वसमत / प्रतिनिधी

यावर्षीही राजुभैय्या नवघरे मित्र मंडळाने सामुहीक विवाह सोहळयाचे आयोजन केले आहे. १०१ जोडप्यांचा विवाह थाटात दि. ७ मे रोजी संपन्न होणार आहे. विवाह सोहळयाची पहिली निमंत्रण पत्रिका श्री क्षेत्र बाराशिव हनुमान यांच्या चरणी देऊन वाटपास सुरुवात करण्यात आली आहे. विवाह सोहळयास ७० हजारावर जनसमुदायाची उपस्थिती राहणार असल्याने तशी व्यवस्था राजुभैय्या नवघरे मित्र मंडळाने केली आहे. आज पर्यंत ६१ जोडप्यांची नोंद झाली आहे. विवाह सोहळयाची नोंद १०१ होण्याची शक्यता आहे.

वसमत तालुक्यात जेमतेम पाऊस पडत आहे. सिध्देश्वर, येलदरी धरणात पाणी साठा नसल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. शेतकऱ्यांना मुला- मुलींची लग्नासाठी मोठा आर्थिक फटका बसत आहे. शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडत आहे. त्यांना आधार देत राजुभैय्या नवघरे मित्र मंडळाने २०१८ मध्ये बाराशिव येथे ५४ जोडप्यांचे लग्न लावुन देत आदर्श निर्माण केला होता. तोच यावर्षी वसमत तालुका दुष्काळ यातना भोगत आहे.चुकीच्या आणेवारीने वसमत तालुका दुष्काळ यादीतुन वगळल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. सध्या सर्वत्र पाणी टंचाईने उग्र रुप धारण केले आहे. जनावरांचा चारा, पाणी प्रश्न गंभीर बनला आहे. यावर्षी शेतकऱ्या समोर आपल्या मुला- मुलींच्या लग्नाचा प्रश्न पडला आहे. शेतकऱ्यांना आर्थिक संकटा पासुन वाचविण्यासाठी दि. ७ मे रोजी राजुभैय्या नवघरे मित्र मंडळाने १०१ जोडप्यांच्या विवाह सोहळयाचे आयोजन श्रीक्षेत्र बालाजी मंदिर शिवपुरी येथे केले आहे. अद्याप ६१ जोडप्यांची नोंद झाली आहे. विवाह साठी नोंद घेणे चालु आहे. १०१ विवाह सोहळ्याची नोंद होणार असल्याची माहीती राजुभैय्या नवघरे मित्र मंडळाच्या वतीने देण्यात आली आहे. विवाह सोहळयात वधु-वरांना आहेर, मणी मंगळसुत्र, कपाट यासह संसार उपयोगी साहित्य मित्र मंडळाच्या वतीने देण्यात येणार आहे. १०१ सामुहीक विवाह सोहळयाचे पहिले निमंत्रण दि. २० एप्रिल रोजी श्री क्षेत्र बाराशिव हनुमान यांच्या चरणी राजुभैय्या नवघरे यांनी दिले. यावेळी बबलु कदम, विश्वनाथराव कदम, आदित्य आहेर, हरिभाऊ कदम यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. विवाह सोहळयाचे निमंत्रण वसमत विधानसभे सह आदींना असणार आहे. विवाह सोहळयास ७० हजाराच्या वर जनसमुदाय उपस्थिती लावणार असल्याने शिवपुरी येथे जय्यत तयारी करण्यात येत आहे. शासनाने वसमत तालुक्यास दुष्काळ यादीतुन वगळत तालुक्यावर अन्याय केला आहे. शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. त्यांच्या मुला मुलींच्या लग्नाचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी सामुदायीक विवाह सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. विवाह सोहळयासाठी नाव नोंदणी करावी असे आवाहन राजुभैय्या नवघरे मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



## हिंगोलीत ॲथेलॅटीक्स शिबिराचे उद्घाटन

हिंगोली / प्रतिनिधी

शालेय विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक क्षमता वाढावी, बौद्धीक विकास व्हावा याकरिता शहरातील राज्य राखीव दलाच्या मैदानावर हिंगोली क्रीडा भारती व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ॲथेलॅटीक्स व बौद्धीक शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

१२ ते १९ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी सकाळी ५.३० ते सायंकाळी ६.४० या वेळेमध्ये १९ ते २८ एप्रिल दरम्यान हे शिबीर पार पडणार आहेत. शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी माजी आ.गजाननराव घुगे, राज्य राखीव दलाचे प्रभारी समादेशक आर.बी.जाधव, उपनिरीक्षक वाघमारे, क्रीडा भारतीचे उपाध्यक्ष रत्नाकर महाजन, अभयकुमार भरतीया, आशिष पिंगळकर यांच्यासह विशाल शिंदे, वैजनाथ गाडे, रामप्रकाश व्यवहारे, शिवाजी इंगोले, संजय घुमरे, संदीप लोंढे, सुधाकर पाईकराव, गजानन आडे यांची उपस्थिती होती. या शिबीरामध्ये २० मुले व १५ मुली सहभागी झाले असून शिबीरादरम्यान शारीरिक व मानसिक सुदृढतेचा विकास, मुलभूत हालचालींचा दर्जा सुधारणे, बौद्धीक व्याख्यान, शरीर, वजन व उंची वाढीस उपयुक्त व उन्हाळी सुट्ट्यांचा सदुपयोग हे वैशिष्ट शिबीरात समाविष्ट करण्यात आले आहे. शिबीरामध्ये रमेश गंगावणे, प्रा.डॉ.संदीप लोंढे, सुधाकर पाईकराव व गजानन आडे हे प्रशिक्षक म्हणून काम पाहणार आहेत. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लक्ष्य २०१९

लोकसभा निवडणूक रणधुमाळी विशेष



टिचकी

नव्या विकासाची नवी स्वप्नं
दाखवताहेत स्वप्नांचे सौदागर
ज्याला भुलेल मतदारराजा
तोच बनणार बाजीगर



## माहीत आहे?

अंदमान-निकोबारमध्ये ४१ मतदार स्ट्रेट आयलंडच्या ग्रेट निकोबार जनजातीचे, ६५ मतदार 'हट बे'तील ओंगे जनजातीचे तर १०० मतदार 'कॅम्पबेल बे'तील शोंपेन जनजातीचे आहेत.

■ त्रिपुरामध्ये राहणाऱ्या ब्रु शरणार्थींसाठी मिझोरामच्या कान्हमुनमध्ये त्रिपुरा सीमेवर १५ विशेष मतदान केंद्रे बनवण्यात आली आहेत.

■ सतराव्या लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात राज्यातील १४ लोकसभा मतदारसंघांत २४९ उमेदवार नशीब अजमावत असून, त्यात केवळ १८ महिला उमेदवारांचा समावेश आहे. त्यात राष्ट्रीय पक्षांच्या तीनच महिला उमेदवारांचा समावेश आहे. भाजप महाराष्ट्रात २५ जागांवर निवडणूक लढवत असून, सात ठिकाणी महिलांना उमेदवारी दिली आहे. शिवसेनेने २३ पैकी केवळ एकाच महिला उमेदवाराला संधी दिली आहे. काँग्रेसकडून दोन, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून एक महिला उमेदवार रिंगणात आहे.

■ तिसऱ्या टप्प्यातील बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादीकडून खासदार सुप्रिया सुळे व भाजपकडून कांचन कुल रिंगणात असून, त्यांच्यात सरळ लढत होत आहे, तर हिंदुस्थान जनता पार्टीने सविता कडाळे यांना उमेदवारी दिली



आहे. पुण्यातून कांचन क्षीरसागर या एकमेव महिला अपक्ष उमेदवार आहेत. रावेरमधून रक्षा खडसे रिंगणात असून, मुस्लिम लीगने रोशन सिद्दिक अली यांना उमेदवारी दिली आहे. नाजमिन शेख या अपक्ष निवडणूक लढवत आहेत.

## लीडरशिप

### मेहबुबा मुफ्ती

## वादग्रस्तता हीच ओळख

भारताचा अविभाज्य भाग असणाऱ्या जम्मू आणि काश्मीरचा मुद्दा देशाच्या राजकारणात सध्या केंद्रस्थानी आणला जात आहे. देशातील दोन्ही राष्ट्रीय पक्षांच्या जाहीरनाम्यामध्ये काश्मीरसंबंधीच्या कायद्यांमधील दुरुस्त्यांचा उल्लेख आला आहे. भाजपाने कलम ३७० काढून टाकण्याची हमी या संकल्प पत्रातून दिली आहे. याबाबतचे वृत्त जाहीर झाल्यानंतर किंबहुना त्याआधीपासूनच जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री



मेहबुबा मुफ्ती यांनी इशारे दिले आहेत. कलम ३७० काढल्यास काश्मीर भारतापासून वेगळा होईल असा गर्भित इशारा त्यांनी दिला आहे. जम्मू-काश्मीरमध्ये मागील काळात सत्तेत असणाऱ्या भाजपा-पीडीपी आघाडी सरकारच्या प्रमुख राहिलेल्या मेहबुबा या अलीकडील काळात सातत्याने अशा वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत असतात.

उर्वरित भारतातील लोकांना पीडीपी प्रमुख मेहबुबांची ही विधाने काश्मीरच्या दृष्टीने धोक्याची वाटतात, पण पीडीपीची ही राजकीय नीती राहिलेली आहे. काश्मीरमध्ये पीडीपीचा प्रभाव आहे. तिथे एक वर्ग काश्मिरीयतबाबत सहानुभूती बाळगून आहे. मेहबुबा मुफ्ती याच वर्गाच्या व्होट बँकेच्या आधारे सत्तेच्या आसपास राहतात.

मेहबुबा मुफ्ती जेव्हा सरकारमध्ये होत्या तेव्हा नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारुक अब्दुल्ला आणि उमर अब्दुल्ला यांनी अनेकदा दक्षिण काश्मीरमधील सभांमध्ये भारत सरकारला टोचणारी विधाने केलेली आहेत. कारण त्यांना पीडीपीच्या व्होट बँकेमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचा शिरकाव करायचा आहे. ही मते आपल्याकडे आकृष्ट करुन घ्यायची आहेत.

आज जम्मू-काश्मीरमधील भाजपासोबतचे सरकार पडल्यानंतर मेहबुबा मुफ्ती यांना आपला जनाधार कमी होण्याची भीती वाटत आहे. त्यामुळेच पुन्हा त्या टोकाची विधाने करून काश्मीरी जनतेत लोकप्रिय होण्याचा प्रयत्न करत आहेत.

मेहबुबा मुफ्ती यांचा राजकीय प्रवास अत्यंत रंजक राहिला आहे. पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षाचे संस्थापक आणि माजी केंद्रीय गृहमंत्री व जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री राहिलेले दिवंगत नेते मुफ्ती मोहम्मद सईद यांची कन्या असणाऱ्या मेहबुबांचा जन्म २२ मे १९५९ रोजी अनंतनाग जिल्ह्यातील अखरण नोव्पोरामध्ये झाला. राजकीय प्रवासात त्यांनी जम्मू-काश्मीरची तेरावी आणि राज्यातील पहिली महिला मुख्यमंत्री बनण्याचा सन्मान मिळवला. मेहबुबांच्या आधी १९८० मध्ये आसामच्या मुख्यमंत्री सैयदा अनवरा तैमूर यांनी भारतातील पहिल्या मुस्लिम मुख्यमंत्री बनण्याचा मान मिळवला होता. त्यामुळे मेहबुबा या दुसऱ्या मुस्लिम मुख्यमंत्री ठरल्या. त्या अनंतनाग जिल्ह्यातील लोकसभा खासदार राहिल्या आहेत. यावेळीही मेहबुबा निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

- ■ मुफ्ती मोहम्मद सईद यांच्या निधनानंतर मेहबुबांनी भाजपा-पीडीपी सरकारची कमान आपल्या खांद्यावर घेतली होती.
- ■ मेहबुबा या कायद्याच्या पदवीधर आहेत. राजकारणात सहभागी होण्यापूर्वी त्यांनी आपल्या पहिल्या पतीला तलाक दिला आहे.
- ■ १९९६ च्या निवडणुकांमध्ये चर्चित आणि प्रसिद्ध चेहरा म्हणून समोर आलेल्या मेहबुबांनी १९९९ मध्ये आपल्या आमदारकीचा राजामा दिला आणि काँग्रेसमधून बाहेर डत त्या जम्मू-काश्मीर पीपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या उपाध्यक्ष बनल्या.
- ■ २००२ च्या निवडणुकांमध्ये पहलगाम मतदारसंघातून अहमद मीर यांच्या विरुद्ध त्यांनी दक्षिण काश्मीरमध्ये विजय मिळवला आणि नंतर त्या २००४ व २०१४ मध्ये अनंतनाग लोकसभा मतदारसंघातून खासदार बनल्या.
- ■ पीडीपीने २०१४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये सहा जागांपैकी ३ जागांवर विजय मिळवला होता.
- ■ २००९ मध्ये मेहबुबा पीडीपीच्या अध्यक्षा बनल्या आणि आज त्या पक्षाचे नेतृत्त्व करत आहेत.

दिंडोरी लोकसभा मतदारसंघ हा २००९ च्या पुनर्रचनेनुसार तयार झालेल्या या मतदारसंघात सुरूवातीपासून भारतीय जनता पक्षाचेच वर्चस्व आहे. २००९ आणि २०१४च्या लोकसभा निवडणुकींत या मतदारसंघातून भाजपचे हरिश्चंद्र चव्हाण हेच विजयी झाले होते. या वेळी भाजपने डॉ. भारती पवार यांना उमेदवारी दिली आहे. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे धनराज महाले आहेत. भारती पवार पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होत्या आणि महाले शिवसेनेत होते. थोडक्यात दोन्ही पक्षांना परस्परांकडून आयात केलेल्या उमेदवारांना निवडणूक रिंगणात उतरवले आहे.

## आयात उमेदवारांत मुकाबला

दिंडोरी लोकसभा मतदार संघात नांदगाव, कळवण, चांदवड, येवला, निफाड आणि दिंडोरी या विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. २००९च्या निवडणुकीत येथे भाजपचे उमेदवार हरिश्चंद्र चव्हाण हे निवडणूक रिंगणात होते. आणि त्यांच्या व्यतिरीक्त राष्ट्रवादी काँग्रेस, बहुजन समाज पार्टी, माकप, भारिप बहुजन महासंघ आणि काही अपक्ष उमेदवार रिंगणात होते. चव्हाण यांनी त्यावेळी राष्ट्रवादीच्या नरहरी झिरवाळ यांचा ३७ हजार मतांनी पराभव केला होता.



२०१४ च्या निवडणुकीत राष्ट्रवादीकडून भारती पवार निवडणूक रिंगणात होत्या आणि भाजपचे हरिश्चंद्र चव्हाण हेच उमेदवार होते. त्याचबरोबर माकपचे हेमंत वाघेरे, बसप, बीबीएम, आम आदमी पक्ष, बीएमपी वगैरे पक्ष निवडणूक रिंगणात होते. त्यावेळी मोदी लाट होती. त्यामुळे अपेक्षेप्रमाणे भाजपचे चव्हाणच निवडून आले. ते नुसतेच विजयी झाले नाहीत तर त्यांचे मताधिक्यही चांगलेच वाढले होते.

या मतदारसंघात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य मोठे आहे, त्याशिवाय संघ परिवारातील वनवासी कल्याण आश्रमाचे कार्यही लक्षणीय आहे. त्याचबरोबर भाजपनेही या मतदारसंघावर आपली मजबूत पकड निर्माण केली आहे. ही पकड ढिली करणे सोपे काम नाही. आता २०१९मध्येही भाजप हा मतदारसंघ सहजपणे राखू शकेल अशी स्थिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला अद्याप या मतदारसंघात आपले पाय रोवता आलेले नाहीत. त्यामुळे आता शिवसेनेतून राष्ट्रवादीत गेलेल्या महाले यांना उमेदवारी दिली असली तरी भाजपकडून हा मतदारसंघ खेचून घेणे राष्ट्रवादीसाठी अवघडच आहे.

मात्र यावेळी पूर्वाश्रमीच्या राष्ट्रवादीच्या नेत्या भारती पवार भाजपकडून निवडणूक लढवत आहेत आणि शिवसेनेचे पूर्वीचे नेते धनराज महाले हे राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवत आहेत. महाले हे शिवसेनेचे आमदार होते. पण २०१४ मध्ये विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. त्यानंतर




त्यांनी नाशिक जिल्हा परिषदेत आपले बस्तान बसवले. शिवसेनेचा या भागात प्रभाव वाढवण्यात महाले यांचा वाटा मोठा आहे. त्यांना या वेळी लोकसभा निवडणुकीची उमेदवारी मिळावी असे वाटत होते. पण भाजप-शिवसेना युती झाली आणि हा मतदारसंघ स्वाभाविकपणे भाजपकडे गेला. तेव्हा महाले यांचे लोकसभा निवडणूक लढवण्याचे स्वप्न भंगण्याची वेळ आली. मग त्यांनी शिवसेनेतून राष्ट्रवादीत प्रवेश केला आणि आता कधी काळी त्यांना पराभूत करणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांनाच आता महाले यांचा प्रचार करावा लागत आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांत आणि स्थानिक नेत्यांत नाराजी आहे.

### दृष्टिक्षेप मागील मतदानावर

| पक्ष | उमेदवार | २०१४ |
| --- | --- | --- |
| ■ भाजपा | हरिश्चंद्र चव्हाण | ५,४२,७८४ |
| ■ राष्ट्रवादी | डॉ. भारती पवार | २,९५,१६५ |
| ■ बसपा | शरद गवळी | १७,७२४ |

पण महाले यांना उमेदवारी देण्यामागे राष्ट्रवादीचीही काही गणिते आहेत. एक तर महाले यांचा जनसंपर्क दांडगा आहे. शिवसेनेसाठी काम करताना त्यांनी अगदी तळागाळातील लोकांपर्यंत संपर्क साधण्यात ते यशस्वी ठरले होते. काम करणारा नेता अशी त्यांची प्रतिमा आहे. याचा राष्ट्रवादीला फायदा मिळेल आणि भारती पवार यांना ते चांगली टक्कर देऊ शकतील, असा अंदाज आहे.

भारती पवार यांच्यासमोरही मोठे आव्हान आहे. त्या राष्ट्रवादीतून आलेल्या आहेत. त्यामुळे भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना त्या आपल्या वाटत नाहीत. सलग तीन वेळा दिंडोरीतून निवडून येत असलेले खा. हरिश्चंद्र चव्हाण यांना उमेदवारी नाकारण्यात आल्यामुळे ते आणि त्यांचे समर्थकही नाराज आहेत. भारती पवार यांच्यासमोर चव्हाणांना बरोबर घेण्याचे आव्हान आहे.

महाले यांची स्थितीही वेगळी नाही. राष्ट्रवादीतील पदाधिकाऱ्यांना सांभाळण्याची जबाबदारी आता महाले यांना पेलावी लागत आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीतील काँग्रेसमधील विविध गटांना आपल्याबरोबर घेत प्रचार करण्याचे आव्हान महाले यांना पेलायचे आहे.

### दिंडोरी मतदारसंघ

- ■ एकूण मतदार : १५,०२,०३५
- ■ पुरुष : ७,९२,०९५
- ■ महिला : ७,०९,९४०

या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे माजी आमदार रामदास चारोस्कर यांनी नुकताच आपल्या समर्थकांचा मेळावा घेतला आणि या मेळाव्याला नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन उपस्थित होते. याचा भारती पवार यांना फायदा होईल अशी अपेक्षा आहे.

वंचित बहुजन आघाडीचे बापू बर्डे हे निवडणूक रिंगणात आहेत. त्यांचा फारसा प्रभाव पडेल असे नाही. खरी लढत महाले आणि पवार यांच्यातच आहे. नाही म्हणायला मनसे यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस - काँग्रेसबरोबर असल्याने त्या पक्षाची मते कोणत्या बाजूला वळतात हेही पाहणे आवश्यक ठरणार आहे.

अर्थात दिंडोरी लोकसभा मतदारसंघात भाजपचा एवढा प्रभाव आहे की त्याविरोधात सगळे विरोधी पक्ष एकत्रित आले तरी त्याचा पराभव करू शकणार नाही. मात्र भाजपने आपल्या निष्ठावान नेत्यऐवजी राष्ट्रवादीतून आलेल्या भारती पवार यांना उमेदवारी दिल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांत नाराजी आहे. ही नाराजी पक्षश्रेष्ठी कशी दूर करतात यावर भाजपचे पारडे किती जड होते हे अवलंबून आहे.

### कसा आहे मतदारसंघ?

दिंडोरी अनुसुचित जमातीसाठी राखीव असलेल्या या लोकसभा मतदार संघात नाशिक जिल्ह्यातील ११३-नांदगाव, ११७-कळवण(अ.ज.), ११८-चांदवड, ११९-येवला, १२१-निफाळ आणि १२२-दिंडोरी(अ.ज.) या सहा विधानसभा मतदार संघाचा समावेश होत असून सहा विधानसभा मतदार संघाचे कार्यक्षेत्र मिळून या मतदार संघाची निर्मिती करण्यात आली आहे. नांदगाव, कळवण, सुरगणा, देवळा, चांदवड, येवला, निफाड, दिंडोरी व पेठ या नऊ तालुक्यांचा समावेश लोकसभा मतदार संघात येतो. तसेच मालेगाव तालुक्यातील कौळाणे व कळवाडी या दोन महसूल मंडलांचा समावेश आहे. याशिवाय निमगाव, कळवाडी, लासलगाव देवगाव या महसूल मडंलांचा समावेश होतो.

## लक्षवेधी

### किशनगंज मतदारसंघ

## एमआयएमला अपेक्षा उत्तरेतील पहिल्या विजयाची

काँग्रेसचा पारंपरिक बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या बिहारमधील किशनगंज लोकसभा मतदारसंघातील लढत यंदा लक्षवेधी ठरणार आहे. याचे कारण या मतदारसंघात संयुक्त जनता दलाबरोबरच ऑल इंडिया मजलिसे इत्तेहादुल मुसलमीन (एआयएमआयएम) या पक्षाचे उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. या तिरंगी लढतीमुळे काँग्रेसपुढे गड वाचवण्याचे आव्हान उभे राहिले आहे.



■ एमआयएमने पहिल्यांदाच या लोकसभा मतदारसंघातून आपला उमेदवार उभा केला आहे. या पक्षातर्फे माजी आमदार अख्तरुल इमान यांना उमेदवारी देण्यात आली आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये इमान यांना जदयुने उमेदवारी दिली होती. पण मतदानाच्या १० दिवस आधी त्यांनी मुस्लिम मतांची विभागणी होऊ नये आणि भाजपाला पराभूत करता यावे यासाठी उमेदवारी मागे घेण्याची घोषणा केली होती. अर्थात तोपर्यंत उशिर झाला होता. तरीही त्यांना ३.८८ टक्के मते मिळाली आणि ते तिसऱ्या स्थानावर राहिले. २००९ मध्ये जदयुच्या उमेदवाराला १३.४१ टक्के मते मिळाली होती. याचाच अर्थ २०१४ मध्ये जदयुची मते १० टक्क्यांनी घटली. अर्थातच याचा फायदा काँग्रेसला झाला आणि ३४.२९ टक्के मते मिळवत काँग्रेसचे असरारुल हक यांनी या मतदारसंघातून विजय मिळवला. ते २००९ मध्येही विजयी झाले होते. मात्र त्यावेळी त्यांना २०.१८ टक्के मते मिळाली होती.

■ यंदा काँग्रेसला विजय तितकासा सोपा नाही. कारण असरारुल हक यांचे निधन झाले आहे. त्यामुळे काँग्रेसने किशनगंजमधून डॉ. जावेद यांना रिंगणात उतरवले आहे. त्यांच्यापुढे एनडीएचे उमेदवार महमूद अशरफ आणि एमआयएमच्या अख्तरुल यांचे आव्हान आहे. १६.५ लाख मतदार असणाऱ्या किशनगंजमध्ये एकूण १४ उमेदवार रिंगणात असून त्यापैकी ८ मुस्लिम आहेत.

■ असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएम पक्षाला या मतदारसंघाद्वारे उत्तर भारतातील पहिला विजय नोंदवायचा आहे. त्यामुळे स्वतः ओवेसी या मतदारसंघावर लक्ष केंद्रित करुन आहेत. तेथील प्रचार रॅलीमध्ये ते सहभागी होत आहेत. अख्तरुल यांनी २०१५ मध्ये एमआयएममध्ये प्रवेश केला असून पक्षाने त्यांना २०१५ मध्ये कोचाधामन विधानसभा मतदारसंघातून उमेदवारीही दिली होती. पण तेथे ते पराभूत झाले. असे असूनही किशनगंजमध्ये त्यांना रिंगणात उतरवण्यात आले कारण येथे मुस्लिम मतदारांची संख्या ५६ टक्के आहे.


### दृष्टीक्षेप मतदारसंघावर

- ■ १९५७ मध्ये किशनगंज लोकसभा मतदारसंघ अस्तित्त्वात आला. तेव्हापासून आतापर्यंत काँग्रेसने सात वेळा या मतदारसंघातून विजय मिळवला आहे.
- ■ या मतदारसंघातून कोणत्याही पक्षाला सलग तीन निवडणुका जिंकता आलेल्या नाहीत.
- ■ १९५७ आणि १९६२ मध्ये विजयी झालेल्या काँग्रेसला १९६७ मध्ये पराभव पत्करावा लागला. पुढे १९७१, १९८० आणि १९८४ मध्ये पुन्हा काँग्रेसचा उमेदवार या मतदारसंघातून विजयी झाला. पण १९७७ मध्ये काँग्रेसला येथून पराभव पत्करावा लागला होता.
- ■ १९९१ मध्ये जनता दलाचे नेते शहाबुद्दीन, १९९६ मध्ये जनता दलाचेच तस्लीमुद्दीन, १९९८ मध्ये पुन्हा राजदकडून तस्लीमुद्दीन आणि १९९९ मध्ये भाजपाचे शाहनवाझ हुसेन आणि २००४ मध्ये पुन्हा तस्लीमुद्दीन असा या मतदारसंघाचा इतिहास राहिला आहे.

## किस्से असेही

## पहिल्या निवडणुकीसाठी पत्नीकडून घेतले १० रुपये

राजस्थान या राज्यात तीन वेळा मुख्यमंत्री राहिलेले भैरोसिंह शेखावत यांनी पहिल्यांदा जेव्हा निवडणूक लढली तेव्हाची ही घटना. १९५२ मध्ये या राज्यात विधानसभेची पहिली निवडणूक झाली. त्यावेळी जनसंघाला दातारामगड मतदारसंघातून एका चांगल्या उमेदवाराची गरज होती. शोध सुरू होता. जनसंघाचे वरिष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक असलेल्या बिशनसिंह शेखावत यांना उमेदवारी देण्याचा प्रस्ताव मांडला. पण बिशनसिंहांनी आपल्याऐवजी आपले मोठे भाऊ भैरोसिंह यांना उमेदवारी द्यावी असे सुचवले. पण अडवाणींनी सांगितले की मी भैरोसिंहांना ओळखतही नाही आणि ते कार्यकर्तेही नाहीत. त्यामुळे ते



निवडणूक कशी जिंकतील? यावर बिशनसिंह म्हणाले की, अडवाणीजी, तुम्ही काळजी करू नका. भैरोसिंहांसोबत माझे नावच पुरेसे आहे. त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून अडवाणींनी भैरोसिंहांना उमेदवारी देण्याची तयारी दर्शवली. त्यावेळी पोलिस दलात सेवेस असणारे भैरोसिंह नोकरी सोडून दातारामगढमधील घरी आलेले होते. भावाने त्यांना निवडणूक लढण्यासाठी तयार केले. तिकिट मिळाले, पण निवडणूक लढण्यासाठी त्यांना सीकरला जायचे होते. यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते. त्यावेळी भैरोसिंहांनी आपली पत्नी सूरज कंवर यांच्याकडून १० रुपये घेतले आणि सीकरला रवाना झाले. या निवडणुकांमध्ये शेखावत यांनी २५०० हून अधिक मताधिक्याने विजय मिळवला. नंतरच्या काळात ते जनसंघाच्या राष्ट्रीय संघामध्ये सहभागी झाले.

मराठवाडा नेता
# संमिश्र
सोमवार
दि.२२ एप्रिल २०१९

# नांदेडकरांना सत्संगाची अभूतपूर्व मेजवाणी

## श्रीमद भागवत कथा, राज्यस्तरीय किर्तन महोत्सव;प.पु. रमेशभाई ओझा यांची ही भागवत कथा









नांदेड, दि. २१ :....

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका नुकत्याच पार पडल्यानंतर राजकाणाचा माहोल तुर्तास संपला असून आता नांदेडकरांना दोन श्रीमद भागवत कथा, राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवाच्या माध्यमातून सत्संगाची अभूतपूर्व मेजवाणी प्राप्त होणार आहे. आयुष्यातील कांही क्षण अध्यात्मात घालविण्याची संधी मिळणार आहे. दि. २५ एप्रिल ते दि. १ मे २०१९ या काळात श्रीमद् भागवत कथा, कीर्तन महोत्सव त्यानंतर दि. ९ ते १६ मे दरम्यान प्रख्यात कथाकार रमेशभाई ओझा यांच्या श्रीमद भागवत कथेचे आयोजन नांदेड नगरीत करण्यात आले आहे.

श्री स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र सोमेश कॉलनी नांदेड द्वारा आयोजित श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त वेदमुर्ती भागवताचार्य प.पू. मनिषभाई ओझा जोधपूर (राजस्थान) यांची श्रीमद भागवत कथा आयोजित केली आहे. सदर कथा दि. २५ एप्रिल ते १ मे २०१९ या दरम्यान दररोज दुपारी २.३० ते ५.३० या वेळेत गंधर्व नगरी, कलामंदिर नांदेड येथे संपन्न होणार आहे. स्व. कमलाबाई हरीप्रसाद जोशी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हरीप्रसाद लक्ष्मीनारायण जोशी, गणेश जोशी, नंदकिशोर जोशी हे भागवत कथेचे यजमान असणार आहेत.

**राज्यस्तरीय कीर्तन महोत्सव**

श्रीमद भागवत कथेसोबतच उपरोक्त काळात श्री स्वामी समर्थ संगीत दरबार अंतर्गत नांदेड शहरात प्रथमच भव्य राज्यस्तरीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तन महोत्सवात झी टॉकीज वाहिनीवरील मन मंदिरा गजर भक्तीचा या कार्यक्रमातील ख्यातनाम कीर्तनकारांचा गजर सादर होणार आहे. दररोज रात्री ८ ते १० या वेळेत सादर होणाऱ्या किर्तन महोत्सवात दि. २५ एप्रिल



रोजी ह.भ.प. श्री स्वामीजी विवेकानंदजी शास्त्री महाराज, (महंत श्री सिद्धेश्वर संस्थान, शिरुर कासार), दि. २६ एप्रिल रोजी वाणीभुषण महादेव राऊत बीड, दि. २७ एप्रिल रोजी ह.भ.प. विनोदाचार्य सुधाकरराव वाघ पैठण, दि. २८ एप्रिल रोजी ह.भ.प. गोसेवक विर्भरत्न संजय महाराज पाचपोर, दि. २९ एप्रिल रोजी विनोदाचार्य केशव उखळीकर आळंदी, दि. ३० एप्रिल रोजी ह.भ.प. हिदुधर्मप्रसारक ज्ञानेश्वर जळकेकर जळगाव आणि दि. १ मे रोजी ह.भ.प. समाधान शर्मा केज यांची किर्तनसेवा होणार आहे.


**पालखी-शोभायात्रा**

दि. २५ एप्रिल रोजी सकाळी ८.३० ते ११ या वेळेत स्वामींची पालखी व कलश शोभा यात्रा श्री स्वामी समर्थ मंदीर, सोमेश कॉलनी ते पंचवटी हनुमान मंदिर महाविर चौक परत श्री स्वामी समर्थ मंदी आणि सकाळी ११.३० वा. भागवत स्थापना केली जाणार आहे.

**दैनंदिन कार्यक्रम**

दररोज सकाळी ६ ते ८ स्वामींना अभिषेक व आरती, दुपारी १२ वा. घंगाळभोग व मध्यान्ह आरती, दुपारी २.३० ते ५.३० भागवत कथा, सायंकाळी ७ वा. नित्यआरती, ८ ते १० स्वामी समर्थ संगीत दरबार अंतर्गत राज्यस्तरीय किर्तन महोत्सव साजरा होणार आहे. श्रीमद भागवत कथे दरम्यान दैनंदिन कार्यक्रम पुढीलप्रमाणे दि. २५ एप्रिल रोजी गणेश पुजन, कथा महात्म्य, राजा परिक्षित, श्राप कथा, शुकदेव मुनी आगमन. दि. २६ एप्रिल रोजी श्री शुक परिक्षीत चरित्र, मनुकर्दम चरित्र, वराह अवतार, दि. २७ एप्रिल रोजी श्री सती चरित्र, ध्रुव आख्यान, भरत चरित्र, नृसिंह अवतार. दि. २८ एप्रिल रोजी गजेंद्र मोक्ष, वामन अवतार, श्रीराम जन्मोत्सव, कृष्ण जन्मोत्सव, दि. २९ एप्रिल रोजी नंदोत्सव, बालकृष्ण लिला, गोवर्धन लिला, अन्नकुट प्रसाद भोग, दि. ३० एप्रिल रोजी राम लिला, राम पंचाह्यायी, श्रीकृष्ण-रुक्मिणी विवाह आणि दि. १ मे रोजी द्वारका लिला, सुदाम चरित्र, भागवत धर्म, कथा सार व कथा विश्राम. भागवत कथा संपल्यानंतर दररोज प्रसादाची (भोजन) व्यवस्था श्री स्वामी समर्थ मंदीर व अन्नछत्र येथे करण्यात आली आहे. सांगता व महाप्रसाद दि. २ मे रोजी गुरुवारी दु. १ ते ४ या वेळेत होईल.

### रमेशभाई ओझा यांच्या भागवत कथेचे आयोजन



दि. २ मे २०१९ पर्यंत मनिषभाई ओझा यांची श्रीमद् भागवत कथा आणि राज्यस्तरीय किर्तन महोत्सव पार पडल्यानंतर लगेच दि. ९ ते १६ मे दरम्यान सुप्रसिद्ध भागवताचार्य रमेशभाई ओझा यांच्या श्रीमद भागवत कथेचे आयोजन प्रसिद्ध उद्योजक स्व. गणपतरावजी मोरगे यांच्या स्मरणार्थ भक्ती लॉन्स, मालेगाव रोड, नांदेड येथे करण्यात आले आहे.

सत्संग समिती नांदेडच्या वतीने आयोजित या कथेची जय्यत तयारी केली जात असून परमपूज्य रमेशभाई ओझा हे जगातील किर्तीचे कथा प्रवक्ते आहेत. दररोज दुपारी ३.३० ते ६.३० या वेळेत भक्ती लॉन्स येथे कथा संपन्न होणार असून कथेचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, अशी विनंती सत्संग प्रतिष्ठाण व सुमित गणपतराव मोरगे यांनी केली आहे.

**मनिषभाई ओझा यांचा अल्पपरिचय**

वेदमुर्ती भागवताचार्य पं. मनिषभाई ओझा, जोधपूर यांचा अल्पपरिचय पुढीलप्रमाणे - भाईजींचा जन्म सारस्वत ब्राह्मण भारद्वाज गोत्रात झाला. मनिषभाई यांचे वडिल गोपाल ओझा जोधपुर नगर परिषदेत अतिक्रमण निरीक्षक तर आई रमा ओझा भाजपच्या माजी उपाध्यक्षा आणि राजस्थान ब्राह्मण महासभेच्या माजी अध्यक्षा म्हणून जबाबदारी पार पडली. मनिषभाई ओझा आज संपूर्ण भारतात आपली अनोखी शैली, सारगर्भित भागवत विवेचन, मधुरवाणी व भक्तिमय रसपान करणाऱ्या कथाकारात सुपरिचित आहेत. भाईजींनी वयाच्या १४ व्या वर्षी गुरुदेव गोविंददेव गिरीजी महाराज यांच्याकडून दीक्षा प्राप्त केली. ब्रह्म सावित्री वेद विद्यापीठ, पुष्कर येथे वेदाध्यापक महेश नन्दे व श्रीराम जोशी गुरुजी यांच्या मार्गदर्शनात वेदाध्ययन केले. वेदमूर्ती पदवी प्राप्त केल्यानंतर जगद्गुरु रामान्दाचार्य संस्कृत विश्वविद्यालय, जयपूर येथून ज्योतीषाचार्य ही पदवी संपादन केली. त्यानंतर भाईजींनी वृंदावन धाम येथे गुरुदेव नेत्रपाल शास्त्री यांच्या मार्गदर्शनात श्रीमद भागवत व अन्य पुराणातील श्लोकांचा अभ्यास केला. आजपर्यंत केवळ भारत देशच नव्हे तर जगात अनेक ठिकाणी भाईजींनी आपल्या मधुरवाणीतून सत्संग घडवून आणला. अमरनाथ, पुष्करराज, महाकालेश्वर, नासिक, मदुराई, इचलकरंजी, वारासणी, गुवाहाटी, कर्नाटक, गुजरात, महाराष्ट्र, हिमाचल, दुबई, हाँगकाँगसह अनेक ठिकाणी भाईश्रींच्या कथेचे यशस्वी आयोजन संपन्न झाले.

**बाबाजींचे आशिर्वाद**

उपरोक्त दोन्ही सत्संग आयोजनास परमपुज्य गोपालक, हनुमान भक्त, नांदेड भुषण जगदिश बाबाजी यांचे आशिर्वाद व प्रेरणा प्राप्त असून त्यांच्याच मार्गदर्शनात जय्यत तयारी केली जात आहे.

---

## प्रसिद्ध ज्योतिष शेखर चौधरी आणि त्यांची कथा

भारताच्या स्टील सिटी - जमशेदपूर येथे जन्मलेले आणि मोठे झाले, शेखर चौधरी एक बहुमुखी व्यक्ती आहे. २००१ मध्ये ते उच्च शिक्षणासाठी पुणे येथे गेले, जिथे त्यांनी सॉफ्टवेयर अभियांत्रिकी पूर्ण केली आणि संप्रेषणामध्ये काम केले. कॉरपोरेट बिझिनेस शो आणि मॅनेजमेंट ट्रेनिंगसाठी त्यांनी बऱ्याच वेळा अमेरिकेला प्रवास केला, जिथे त्याच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरही फायदा झाला.



पण २०१२ मध्ये, अध्यात्मशास्त्रीय तात्काळ तोडगा आला जो त्याने दुर्लक्ष केला नाही आणि कॉर्पोरेट जगापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला आणि आपल्या जीवनाचा हेतू शोधण्यासाठी अध्यात्मिक प्रवास सुरू केला.

आपल्या आयुष्याच्या या बदलत्या काळात, शेखर आध्यात्मिक आनंदाच्या शोधात देशाच्या मुख्य देवळाकडे गेला. शेवटी, ऋषिकेशच्या जवळ असलेल्या वशिष्ठ गुहेच्या आत ध्यानानंतर, तो एक नवीन व्यक्तिमत्त्व बनला.

यानंतर लवकरच त्यांनी मूळ वैदिक विज्ञानाच्या महासागरामध्ये आपला मूलभूत सिद्धांत समजून घेण्याचा निर्णय घेतला. ज्यापासून वैदिक ज्योतिषाने आपले लक्ष वेधून घेतले आणि हळूहळू त्याने या खगोलशास्त्रीय विज्ञानावर विस्तृत संशोधन केले, ज्याने शेवटी त्याला एक ज्योतिषी आणि जीवन मार्गदर्शक बनविले.

आज ज्योतिष हा त्यांचा एकमात्र व्यवसाय आहे, शेखर आपल्या अध्यात्मिक आणि अद्भुत ज्योतिषविषयक ज्ञानाद्वारे मार्गदर्शन करीत आहे, जी त्याने वेळोवेळी प्राप्त केली आहे! त्यांनी मासिके आणि वर्तमानपत्रांसाठी लेख लिहिले, ज्याचे जगभरात कौतुक केले जात आहे.पर्यावरणाची बचत करण्यासाठी आणि त्यांच्या निःस्वार्थ स्वयंसेवकांच्या सेवेसाठी पर्यावरण कार्य करण्यासाठी कार्यरत असलेल्या गैर सरकारी संस्थांनी शेखर यांना सन्मानित केले आहे. आज ते सर्व इच्छुक साधकांना अध्यात्मिक विज्ञान शिकवतात आणि पूर्ण चंद्र ध्यान आयोजित करतात.आम्ही शेखरला त्याच्या उज्वल भविष्यासाठी सर्वतोपरी शुभेच्छा देतो. जर तुम्हाला वैयक्तिक ज्योतिषविषयक परामर्श हवे असेल तर आजच त्यांच्याशी संपर्क साधा आणि आपल्या आयुष्यात बदल करा कारण चांगला सल्लुया म्हणजे नवीन जन्म जो शेखर चौधरी तुम्हाला देऊ शकतो. त्याला संपर्क करण्यासाठी त्याच्या वेबसाइटला भेट द्या www. shekharchowdhry.com



माढा लोकसभेचे उमेदवार रणजितसिंह नाईक निबांळकर यांच्या प्रचारात संपूर्ण माढा शहरात कानर बैठका घेताना व पंतप्रधान नरेंद्र मोदीळ सरकार नी केलेले काम व योजना सांगितल्या देशाच्या हितासाठी व देशाच्या विकासाठी ,माढा चा विकास करण्यासाठी मतदान करावे हे या बैठकातून सांगितले .महिला मोर्चा प्रदेश सचिव स्वाती जाधव पाटिल, माढा नगरपंचायत नगर अध्यक्ष ॲड मिनल साठे ,विविध प्रभागातील नगरसेविका, व महिला.

# उदगीर तालुक्यात पाण्याचा ठणठणाट

## अख्खी रात्र जागली तरी घागरभर पाणी मिळेना





■ अमोल कळसे

उदगीर : पाणी टंचाईचा प्रश्न आता कुठल्या एका विशिष्ट परिसराचा राहिलेला नसून ग्रामीण व शहरी अशा सर्वच भागात कमी-अधिक फरकाने नागरिकांचे घसे कोरडे पडू लागले आहेत. उन्हाचा तडाखा वाढत असतानाच, तालुक्याच्या विविध भागातील पाण्याच्या टंचाईचा आणि त्यापायी उभ्या टाकलेल्या संकटाचा हा विस्तृत परिणाम नागरिकावरती येऊन पडला आहे. या सततच्या अवर्षणाने आताशा उद्योगधंदेही संकटात सापडत आहेत. शहरांना होणारा पाणीपुरवठा आटू लागला असून, मार्च-एप्रिलपासूनच पाणीकपातीस नागरिकांना तोंड द्यावे लागते आहे. विशेषतः रात्र-रात्र जागुन सुद्धा एक घागर भर पाणी मिळत नाही तर मग प्रशासन करतय तरी काय ना कुठला उपाय नाही ना कुठलं टँकर नाही दुष्काळ असुन सुद्धा पाण्याचं काही नियोजन नाही असे विविध प्रश्न उदगीर -जळकोट विधानसभा मतदार संघातील नागरिकांना पडला आहे.

मात्र गेल्या वर्षी सर्व पावसाने सरासरीही न गाठल्याने केवळ शेतीच संकटात सापडली असे नव्हे; तर पिण्याच्या पाण्याचेही वांधे झाले आहेत. उदगीर विभागातील सर्वाधिक नागरीकरण झालेल्या व जळकोट तालुका या दोन्हीची पाण्याची वाढती तहान भागविली जाऊ शकत नाही हे सत्य यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले. पाणीपुरवठ्याच्या सोयी वाढविणे ही आता काळाची गरज बनली आहे. माणूस अडचणीत असला तर तो जगण्यासाठी काही तरी हातपाय तरी हलविल; पण लक्षावधींच्या संख्येने असलेल्या जनावरांना तर कोणीच वाली नाही. सध्या तरी कोठेच चारा टंचाईच्या बाबतीत कोणी ठोस भुमिका घेतल्याचे पहावयास मिळत नाही . काही ठिकाणी जनावरांसाठी छावण्या सुद्धा दिल्या नाहीत . उदगीर या शहरास तब्बल २० दिवसांनी तर जळकोट येथे महिन्यातुन केवळ एक दिवस पाणीपुरवठा होतो. तापमानाचा पारा दिवसेंदिवस आग ओकत असल्याने बाष्पीभवनाचा वेगही वाढता आहे. त्यामुळेच जलसाठ्यांचे आटण्याचे प्रमाणही वाढत असून, टँकरची संख्या अन् फेऱ्या दिवसागणिक एक सुद्धा नाही सध्या धरणात जे पाणी आहे, ते जुलै अखेरपर्यंत टिकविण्याची यातायात प्रशासनाला करावी लागणार आहे. कारण वेळेवर पाऊस सुरू झाला तरी नदीनाल्यांद्वारे भरणारा धरणांचा पाणीसाठा लागलीच होत नाही. उदगीर जळकोट शहराला एकही टँकर चालू नाही. जून अखेरपर्यंत सर्वत्र पाणी मिळेल काही सांगता येत नाही . या दोन्ही तालुक्यात काटकसरीचे संस्कार परिस्थितीनेच त्यांच्यावर रुजविले असल्याने पाणी पुरवून वापरणे ही तेथील संस्कृतीच बनली आहे. .

उदगीर -जळकोट विधानसभा मतदार संघातील सर्व ग्रामीण भागात भिषण उष्म तापमाना बरोबरच .या दोन्ही विधानसभा मतदारसंघातील पाणीपुरवठा करणारे बोअरवेल व शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावातुन पाणी २० -२० दिवस नागरिकापर्यंत पोहोचू शकत नसल्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे त्याबरोबरच बोअरवेल हे आतापासूनच दम तोडू लागल्यामुळे काही दिवसातच ही पेयजल ची समस्या उग्र रूप धारण करणार अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे .त्यामुळे आठवड्यातून दोन वेळेस पाणी विकत घ्यावी लागत आहे शहरांना पाणी विकत घेतल्या शिवाय मिळत नाही एक एक महिना नळाला पाणी येत नसल्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर झालेली आहे यात पाणीटंचाईच्या चर्चेबरोबरच उदगीर जळकोट मतदार संघातील सत्ताधाऱ्यावरती प्रश्न उठतो आहे

याच धामधुमीत अनेक समस्या शहराशहरात गावागावात निर्माण झाल्याचे दिसून येत आहे ज्यांचे बोरवेल आहे हे त्यांचं दिवस तरी भागतो मात्र ज्यांच्याकडे बोरवेल नाही त्यांचा दिवस हि घटत नाही त्यामुळे पाण्याच्या शोधात वन्य प्राण्या सारखेच नागरिकांना शोधा शोध घ्यावा लागत आहे म्हणून या उदगीर जळकोट दोन्ही शहरात पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे या निवडणुकीच्या काळामध्ये राजकीय चर्चेबरोबरच पाण्याची ही चर्चा रंगत होती परंतु कोणालाही या पाणी प्रश्नाची जाणीव झाली नाही , स्थानिक पातळीवरी असणारे लहान-मोठे कार्यकर्ते नेते सुद्धा पाणी या प्रश्नाबाबत विचारणा करत नाहीत

हे दोन्ही तालुके पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करीत आहेत. दुष्काळी स्थितीतच निवडणूक आली असली तरी पाणी, शेती, सिंचन आदी प्रश्न मात्र निवडणुकीच्या प्रचारातून हद्दपार झाले आहेत. रखडलेले असंख्य प्रकल्प, पाणीपुरवठा योजना, वीज बिलाअभावी बंद पडलेल्या विविध पाणीयोजना यांची चर्चाही होत नाही. विशेष म्हणजे नागरिकही त्याबाबत फारसे आग्रही दिसत नसल्याने यंदा निवडणुकीच्या माहोलात टंचाईचा काळही सुसह्य झाल्यासारखा वाटतो होते . जाहीर प्रचारामुळे जनतेची करमणूक होत असल्याने पक्ष वा उमेदवारांना कोणी यासंदर्भात प्रश्न विचारताना दिसत नाही. ग्लोबल वॉर्मिगचा धोका दिवसेंदिवस गहन होत चालला असताना त्याचा परिणाम म्हणून पावसाचे कमीअधिक प्रमाण, असह्य उन्हाळा किंवा जीवघेणा हिवाळा या नैसर्गिक संकटांना तोंड द्यावे लागत आहेच. आता गरज आहे ती हा हवामान-बदल समजून घेऊन जनतेला समजेल अशा भाषेत दाराच्या उंबऱ्यात आलेल्या या राक्षसाला थोपविण्याची. तूर्तास, दुष्काळाच्या या भीषण परिस्थितीतच सामना करण्यासाठी टँकर शहरातील प्रत्येक ठिकाणी पाठवणे गरजेचे बनले आहे .

### पाणी टंचाई बाबत कोणीच बोलत नाहीत

पाणी म्हणजे जीवन अन् जीवन म्हणजे पाणी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कडक उन्हाळ्यात कदाचित एकदा तरी कुठल्या प्रभागामध्ये कोणी नगरसेवक जाऊन चर्चा करीत नाही पाण्याबाबत साधी विचारपुसही करत नाहीत वर्षातील ८ महिने पाण्याची काळजी कोणाला नसते. उन्हाळ्यात तरी किंबहुना पाणी बचत, पाणी टंचाई या विषयावर बोलायलासुद्धा वेळ नसतो. उन्हाळ्याच्या झळा लागल्या की सर्वजण खडबडून जागे होतात. तहान लागली की विहीर खोदतात. दिवसेंदिवस कमी होणारे पर्जन्यमान, पाण्याचा तुटवडा, ग्लोबल वार्मिंग, पर्यावरणातील बदल, वाढती लोकसंख्या, कमी पडणारा पाणीसाठा, पाण्याचा अपव्यय अशा बऱ्याच गोष्टींमुळे पाणी टंचाई व दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे. पण कोणी पाणी येतं का ? म्हणुन सुद्धा येत नाही , त्यामुळे नागरिका तुन नाराजगी दिसुन येत आहे.

# कोणाची चड्डी निघाली हे जनता बघेल: मुख्यमंत्री

पंढरपूर : प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांनी ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील यांच्यावर टीका करताना संघाच्या चड्डीचा उल्लेख केला. आता हे चड्डी पुराण गाजंतय. संघाच्या चड्डीवर केलेल्या टिकेचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी समाचार घेत शरद पवारांवर सडकून टीका केली. माढा लोकसभा मतदारसंघातील प्रचाराच्या सांगता सभेसाठी आज मुख्यमंत्री कुर्डुवाडी येथे आले होते. यावेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील सहकारी उपस्थित होते. पहिल्यांदा मुख्यमंत्री होताना हिच चड्डी तुम्हाला चांगली वाटली होती. तेंव्हा चड्डी दिसत नव्हती, असे सांगत आपल्याला इतक्या खालच्या पातळीवर येवुन बोलायचे नाही. पण २३ तारखेला कोणाची चड्डी निघाली हे जनता बघेल, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला. पवारांचा तोल सध्या गेल्यामुळे ते वाटेल ती बडबड करीत असल्याचे फडणवीस म्हणाले. गद्दारी म्हणण्याचा आधिकार तरी यांना आहे का? ज्यांनी मोठे केले त्यांच्याशी यांनी गद्दारी केली, असा टोला मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांना लगावला.